दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | घाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३४१ I गुरूवार २४ सप्टेंबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

साईवेद प्रकाशन
विचारांचा प्रकाश, परिवर्तनाची दिशा
URGENTLY REQUIRED
RECEPTIONIST / TELECALLER - 01
Apply on mail:
saived.print@gmail.com
INTERVIEW DATE: 28 SEPTEMBER 2026
SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED
**Office:** Daily Rashtra Sahyadri Office,
Opposite Mac Care Hospital, Zopdi Canteen, Ahilyanagar.
Mo: 7588605255

# दुष्काळाच्या पाहणीसाठी सरकार बांधावर

## फडणवीस मराठवाड्यात, शिंदे विदर्भात

**पावसाची ३५ टक्के तूट** करपलेली पिके पाहून शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या; दोन दिवसांत मदतीचा शासन निर्णय

**संभाजीनगर :** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांचा दौरा करत करपलेल्या खरीप पिकांची पाहणी केली, तर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांशी संवाद साधत नुकसानीचा आढावा घेतला.



मराठवाड्यात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने मोठी ओढ दिल्याने सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विभागात सरासरीच्या तुलनेत ३५ टक्के पावसाची तूट नोंदली गेली आहे. लातूरमध्ये सर्वाधिक ५० टक्के, धाराशिव व बीडमध्ये ४० टक्के, परभणीत ४३ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यात सुमारे २६ टक्के तूट आहे.

पावसाअभावी शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचे संकटही गंभीर झाले आहे. मराठवाड्यात ऐन पावसाळ्यात २४६ टँकर्स सुरू ठेवावे लागले असून, त्यापैकी १२० बीडमध्ये, ९६ छत्रपती संभाजीनगरमध्ये आणि २२ जालना जिल्ह्यात सुरू आहेत. विभागातील ९१७ मोठे-मध्यम-लघु प्रकल्प व नदीवरील बंधाऱ्यांमध्ये अपेक्षित पाणीसाठ्याच्या तुलनेत सुमारे ५० टक्के तूट असल्याची माहिती विभागीय प्रशासनाने दिली आहे. मांजरा धरणातील अत्यल्प साठ्यामुळे चिंता आणखी वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने उपलब्ध धरणसाठ्यातील पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी राखीव ठेवण्याची खबरदारी घेतली आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना नियमित क्षेत्रभेटी घेऊन पिकांची स्थिती आणि दुष्काळसदृश परिस्थितीचा अहवाल **(पान ४ वर)**



## सामाजिक बांधिलकीच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** नेशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लिमिटेड, नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित 'राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार २०२४-२५' वितरण सोहळ्यात अशोक सहकारी साखर कारखान्यास संस्थात्मक सामाजिक दायित्व क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**अशोक सहकारी साखर कारखान्यास 'राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार'**

नवी दिल्ली येथे झालेल्या या सोहळ्यात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्ण पाल गुर्जर, राष्ट्रीय साखर फेडरेशनचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील तसेच महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा लोकनेते माजी आमदार भानुदास मुरकुटे, व्हाईस चेअरमन आदिनाथ झुराळे, संचालक हिम्मतराव धुमाळ, बाबासाहेब आदिक, पुंजाहरी शिंदे, नीरज मुरकुटे आणि कार्यकारी संचालक संतोष देवकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.या राष्ट्रीय पुरस्कारामुळे अशोक सहकारी साखर कारखान्याच्या सामाजिक बांधिलकीच्या कार्याची देशपातळीवर दखल घेतली गेली आहे. कारखान्याच्या शेतकरी सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी-वाहतूक कामगार, संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या योगदानाचा हा सन्मान असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.अशोक सहकारी साखर कारखान्यास मिळालेल्या या राष्ट्रीय पुरस्कारामुळे कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

### शिक्षण, जलसंधारणातून सामाजिक योगदान

साखर उत्पादनाबरोबरच अशोक सहकारी साखर कारखान्याने शिक्षण, जलसंधारण, कृषी, ग्रामविकास आणि कामगार कल्याण या क्षेत्रांत विविध उपक्रम राबविले आहेत. शैक्षणिक संकुलांची उभारणी, धरणे-बांधारे, ऊस विकास, पाणी बचत तसेच कामगार कल्याणाच्या माध्यमातून परिसराच्या सामाजिक व आर्थिक विकासाला हातभार लावल्याबद्दल कारखान्याची सीएसआर क्षेत्रातील कामगिरी गौरविण्यात आली.

# ऊसाच्या प्रत्येक काट्यावर आता सरकारची नजर!

- साखर कारखान्यांतील वजनकाटे ऑनलाइन करण्याचे आदेश
- अहिल्यानगरच्या ऊस उत्पादकांसाठी 'काटामारी'विरोधातील निर्णायक पाऊल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** ऊस गाळप हंगामाच्या तोंडावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. साखर कारखान्यांतील वजनकाट्यांमध्ये होणारी संभाव्य तफावत आणि काटामारी रोखण्यासाठी साखर आयुक्तालयाने वजनकाटे डिजिटल करून ते ऑनलाइन प्रणालीशी जोडण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. वजनकाट्यांचे कॅलिब्रेशन व सील करताना शेतकरी प्रतिनिधींची उपस्थिती अनिवार्य करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगर हा राज्यातील महत्त्वाचा ऊस उत्पादक जिल्हा आहे. उपलब्ध अधिकृत गाळप आकडेवारीनुसार २०२५-२६ हंगामात जिल्ह्यातील २१ कारखान्यांनी सुमारे १.१५ कोटी टन ऊस गाळप केला. त्यामुळे वजनातील अगदी किरकोळ तफावतही हजारो शेतकऱ्यांच्या एकूण देयकावर मोठा परिणाम करू शकते. याच पार्श्वभूमीवर वजनकाटा 'शेतकऱ्याच्या विश्वासाचा काटा' ठरणार आहे. ऊस कारखान्याकडे पोहोचल्यानंतर त्याचे अचूक वजन किती झाले, वाहनाचे वजन व निव्वळ उसाचे वजन किती, याची डिजिटल नोंद उपलब्ध झाल्यास व्यवहारातील पारदर्शकता वाढण्याची शक्यता आहे. वजनाची नोंद शासकीय प्रणालीवर उपलब्ध राहिल्यास तक्रारींच्या वेळी शेतकऱ्याला ठोस आधार मिळू शकतो.

साखर आयुक्तालयाने आगामी हंगामासाठी वजनकाट्यांच्या अचानक तपासणीसाठी महसूल, पोलीस, वैधमापनशास्त्र, माहिती-तंत्रज्ञान विभाग, प्रादेशिक साखर अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधींचा समावेश असलेली भरारी पथके उभारण्याचे निर्देश दिले आहेत. वजनकाट्यांचे कॅलिब्रेशन करून ते सील करण्यावरही भर देण्यात आला आहे.

अहिल्यानगरमध्ये **(पान ४ वर)**



**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे बदल....**

- ऊस वजनकाटे डिजिटल व ऑनलाइन प्रणालीशी जोडण्याचा प्रयत्न
- कॅलिब्रेशन व सील प्रक्रियेत शेतकरी प्रतिनिधींची उपस्थिती
- वजनकाट्यांच्या अचानक तपासणीसाठी भरारी पथके
- वजनाची डिजिटल नोंद उपलब्ध झाल्यास तक्रारींच्या तपासणीला आधार
- अहिल्यानगरमध्ये २०२६-२७ हंगामासाठी २२ कारखान्यांचे ऑनलाइन अर्ज
- २०२५-२६ मध्ये जिल्ह्यात सुमारे १.१५ कोटी टन ऊस गाळप

# पत्नीची हत्या : पतीला जन्मठेपेची शिक्षा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पत्नीची हत्या केल्याच्या आरोपावरून आरोपी पती संतोष परसराम पटोरकर (वय ३२, रा. बिबामल, ता. धारनी जि. अमरावती) याला प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, श्री एस.बी. कचरे यांनी भा. न्या.सं. कलम ३०२ नुसार आजीवन कारावास शिक्षा व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. या खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने अति. सरकारी वकील ॲड. मंगेश वसंतराव दिवाने यांनी काम पाहिले.

या खटल्याची सविस्तर हकिकत अशी की, आरोपी संतोष पटोरकर हा अहिल्यानगरच्या ब्रीज इंडस्ट्रीज कंपनी, एमआयडीसी येथे त्याची पत्नी व मुलगी समवेत त्याच्या मुकादमासह रात्रभर मुक्कामास आला होता. रात्री जेवण करून दि. ३ एप्रिल २०२१ रोजी रात्रीचे ११.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी त्याची पत्नी व ४ वर्षांची मुलगी येथील सेक्युरीटी केबिनमध्ये झोपले. रात्री केबिनमध्ये कोणीही नसल्याचा गैरफायदा घेत आरोपी संतोष याने त्याच्या पत्नीवर संशय असल्याच्या कारणावरून तिच्या साडीने तिचा गळा आवळून जिवंत ठार मारले.

या खटल्यात एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये, अनिता कुलट, सुमन काळापाड, गणेश तुकाराम काळोखे, कंपनीचे मालक सागर ब्रिजमोहन बक्षी, सहायक फौजदार मोहम्मद उमराव शेख, वैद्यकीय अधिकारी प्रसाद लक्ष्माण सायगावकर, घटनास्थळ पंच यांची साक्ष नोंदवण्यात आली. या गुन्हाचा तपास सहा. पोलिस निरीक्षक युवराज आठरे यांनी करून दोषारोपपत्र जिल्हा न्यायालयात दाखल केले. सीसीटीव्ही व सरकार पक्षाचा भरभक्कम पुरावा व युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकार पक्षाच्यावतीने अति. सरकारी वकील ॲड. मंगेश वसंतराव दिवाने यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी म्हणून पोलिस उपनिरीक्षक महेश जोशी व म.पो.का. श्रीमती. एस. के. गुंजाळ यांनी सहाय्य केले.

# सहकारी साखर कारखान्यांसाठी ७ वर्षांची 'सॉफ्ट लोन' योजना

## थकीत एफआरपीसाठी कर्ज; सहकारी कारखान्यांना १० टक्क्यांपर्यंत व्याज अनुदान

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांची २०२५-२६ गाळप हंगामातील थकीत एफआरपी अदा करण्यासाठी तसेच २०२६-२७ गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी महाराष्ट्र शासनाने 'सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन योजना २०२६' जाहीर केली आहे. २२ सप्टेंबर २०२६ रोजी सहकार विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

२०२५-२६ च्या गाळप हंगामात राज्यातील १०२ सहकारी साखर कारखान्यांनी ५२७.५१ लाख मे. टन ऊसाचे गाळप केले. कारखान्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांना थकीत एफआरपी देण्यासाठी आणि आगामी हंगामाच्या पूर्वतयारीसाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना लागू करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत सहकारी साखर कारखान्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असून, कर्जावरील व्याजासाठी महाराष्ट्र शासनाकडून अनुदान दिले जाणार आहे. खासगी साखर कारखान्यांचा योजनेत समावेश असला तरी त्यांना शासनाकडून व्याज अनुदान मिळणार नाही. २०२५-२६ मधील उत्पादन खर्च आणि साखरेच्या विक्री दरातील तफावत लक्षात घेऊन प्रति गाळप मे. टन ₹३५० या प्रमाणात कर्जमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. संबंधित कारखान्याची गरज व पात्रता तपासून बँका प्रचलित नियमांनुसार कर्ज मंजूर करतील. या कर्जाला महाराष्ट्र शासनाची थकहमी राहणार नाही. योजनेअंतर्गत ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मंजूर व वितरित केलेले कर्जच व्याज अनुदानासाठी पात्र राहणार आहे. कर्जाचा वापर प्रथम २०२५-२६ मधील थकीत एफआरपी देण्यासाठी करणे बंधनकारक आहे.

कर्जाचा वापर केवळ थकीत एफआरपी किंवा पात्र असल्यास आगामी हंगामाच्या पूर्वहंगामी खर्चासाठीच करता येणार आहे. अन्य कोणत्याही कारणासाठी किंवा व्यावसायिक कामासाठी निधी वापरल्यास संबंधित कारखाना व्याज अनुदानासाठी अपात्र ठरेल. योजनेच्या निधीच्या वापराबाबत साखर आयुक्तांकडून प्रमाणित विनियोग दाखला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

एफआरपीची कोणतीही थकबाकी नसलेल्या कारखान्यांना हे कर्ज २०२६-२७ हंगामाच्या पूर्वहंगामी खर्चासाठी वापरता येणार आहे. या कर्जाची परतफेड १ नोव्हेंबर २०२६ पासून सात वर्षांची राहणार असून त्यामध्ये दोन वर्षांचा मोरॅटोरियम कालावधी आहे. कर्जाची परतफेड मासिक, त्रैमासिक, सहामाही किंवा वार्षिक हप्त्यांमध्ये करण्याची मुभा बँक आणि कारखान्याच्या सहमतीने राहणार आहे. कर्जावरील व्याजासाठी वार्षिक १० टक्के किंवा संबंधित बँकेचा प्रत्यक्ष व्याजदर, यापैकी जो कमी असेल, त्या दराने सहकारी कारखान्यांना शासनाकडून व्याज अनुदान मिळणार आहे. कर्जाची वेळेपूर्वी पूर्ण परतफेड केल्यास प्रत्यक्ष कर्जउचल ते परतफेडीच्या कालावधीपर्यंतच्या कालावधीसाठीच व्याज अनुदान दिले जाईल. कर्जाचा मुद्दल हप्ता वेळेत न भरणाऱ्या सहकारी कारखान्यांना योजनेतून तत्काळ वगळण्यात येईल. तसेच थकबाकी झाल्याच्या तारखेपासून पुढील कालावधीसाठी शासनाकडून व्याज सवलत मिळणार नाही. ही योजना साखर आयुक्तांच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून, १५ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार ती जारी करण्यात आली आहे.

# आयआयटीत शिस्त हवी, पण संवेदनशीलताही!

विशेष संपादकीय — करण नवले (संपादक)

देशातील सर्वोच्च तंत्रशिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या आयआयटी मुंबईतील अलीकडील घटनांनी शिक्षणव्यवस्थेसमोर अनेक गंभीर प्रश्न उभे केले आहेत. परीक्षेतील कथित गैरप्रकार, त्यानंतर विद्यार्थ्याचा झालेला दुर्दैवी मृत्यू, विद्यार्थ्यांचे आंदोलन, प्राध्यापकांवरील कारवाई, प्रशासनाची भूमिका आणि त्यानंतर निर्माण झालेला वाद, या संपूर्ण प्रकरणाकडे भावनिक घोषणांपेक्षा अधिक संयमाने आणि तथ्यांच्या आधारे पाहण्याची गरज आहे.

सर्वप्रथम एक बाब स्पष्ट असली पाहिजे की, परीक्षेतील गैरप्रकाराला कोणत्याही परिस्थितीत प्रोत्साहन देता येणार नाही. परीक्षा ही विद्यार्थ्याच्या ज्ञानाचे आणि मेहनतीचे मूल्यमापन करणारी प्रक्रिया आहे. मोबाईल, कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा अन्य साधनांचा नियमबाह्य वापर होत असेल, तर त्यावर कारवाई करणे ही परीक्षा निरीक्षक आणि संस्थेची जबाबदारी आहे. प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांशी न्याय करण्यासाठीही शैक्षणिक शिस्त आवश्यक आहे.

मात्र त्याचवेळी, एखाद्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला की त्या घटनेची संपूर्ण जबाबदारी एका व्यक्तीवर किंवा एका घटनेवर टाकणेही योग्य नाही. उपलब्ध वृत्तांनुसार या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. त्यामुळे अंतिम निष्कर्ष येण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला दोषी किंवा निर्दोष ठरवणे टाळले पाहिजे. आयआयटी मुंबईनेही आपल्या सुरुवातीच्या निवेदनाबाबत दिलगिरी व्यक्त केली असून, प्रकरणातील तथ्य तपासले जात असल्याचे स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे प्राध्यापक सूर्यनारायण डुल्ला यांच्याबाबत झालेली कारवाई आणि आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांच्या राजीनाम्याबाबत पसरलेली माहिती.

## शिक्षणसंस्थांच्या स्वायत्ततेसोबत विद्यार्थ्यांच्या हक्कांचे आणि शिक्षकांच्या प्रतिष्ठेचेही रक्षण गरजेचे

उपलब्ध अधिकृत स्पष्टीकरणानुसार केदारे यांनी राजीनामा दिलेला नसल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे. डुल्ला यांना त्यांच्या प्रशासकीय पदावरून दूर करण्यात आले असून पुढील कारवाई चौकशीनंतर होणार आहे.

म्हणूनच सोशल मीडियावर फिरणाऱ्या प्रत्येक दाव्याला सत्य मानून प्रतिक्रिया देणे धोकादायक आहे. एका बाजूला प्राध्यापकाला केवळ विद्यार्थ्याला परीक्षेतील गैरप्रकारापासून रोखले म्हणून दोषी ठरवणे चुकीचे ठरेल; तर दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांनी मांडलेल्या संस्थात्मक समस्या, मानसिक ताण, तक्रार निवारणाची प्रक्रिया आणि प्रशासनाच्या उत्तरदायित्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणेही तितकेच चुकीचे आहे.

विद्यार्थ्यांचे आंदोलन नेमके कशासाठी होते, हेही समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींनी आपण परीक्षेतील गैरप्रकाराचे समर्थन करीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मागण्यांमध्ये संस्थात्मक उत्तरदायित्व, विद्यार्थी कल्याण आणि प्रक्रियात्मक पारदर्शकतेशी संबंधित मुद्दे असल्याचे वृत्त आहे.

शिक्षणसंस्थेत नियम असले पाहिजेत, पण त्या नियमांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया पारदर्शक आणि संवेदनशीलही असली पाहिजे. शिक्षकांना कोणत्याही दबावाशिवाय आपले कर्तव्य पार पाडता आले पाहिजे. त्याचवेळी विद्यार्थ्यांना आपली बाजू मांडण्यासाठी स्वतंत्र, निष्पक्ष आणि विश्वासार्ह व्यवस्था उपलब्ध असली पाहिजे. जातीय भेदभावाचे आरोप या प्रकरणात पुढे आले आहेत. या आरोपांची चौकशी संबंधित यंत्रणांनी निष्पक्षपणे केली पाहिजे. सामाजिक न्यायाच्या घटनात्मक व्यवस्थेचे महत्त्व कमी करता येणार नाही; त्याचप्रमाणे कोणत्याही आरोपाची सत्यता तपासण्याआधी त्याला अंतिम सत्य मानणेही योग्य नाही. जात, आर्थिक परिस्थिती, सामाजिक पार्श्वभूमी किंवा प्रवेशाचा मार्ग काहीही असो, प्रत्येक विद्यार्थ्याला समान सन्मान, समान नियम आणि न्याय्य प्रक्रिया मिळणे हीच शिक्षणव्यवस्थेची खरी कसोटी आहे.

आरक्षणाबाबतही भावनिक आणि टोकाच्या भाषेपेक्षा घटनात्मक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. आरक्षण हे सामाजिक प्रतिनिधित्व आणि ऐतिहासिक वंचिततेशी संबंधित धोरण आहे. त्याची चर्चा परीक्षेतील गैरप्रकाराच्या प्रश्नाशी मिसळणे म्हणजे दोन स्वतंत्र विषयांची अनावश्यक गल्लत होय. आरक्षण असो किंवा गुणवत्तेचे मूल्यमापन, या दोन्ही बाबतीत नियम, पारदर्शकता आणि न्याय यांना समान महत्त्व असले पाहिजे.

आयआयटीसारख्या संस्थांची प्रतिष्ठा केवळ त्यांच्या क्रमवारीत किंवा संशोधनातील कामगिरीत नाही; तर त्या संस्था कठीण प्रसंगी कशा पद्धतीने निर्णय घेतात, यातही आहे. शिक्षकांची प्रतिष्ठा टिकवणे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कायम ठेवणे हे परस्परविरोधी उद्दिष्ट नाही. उलट, दोन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करता येतात.

आज कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग आहे. चॅट जीपीटी सारखी साधने शिक्षण, संशोधन आणि ज्ञाननिर्मितीसाठी मोठी संधी उपलब्ध करून देत आहेत. पण तंत्रज्ञानाचा वापर परीक्षेच्या नियमांच्या चौकटीबाहेर झाला, तर त्याचे शैक्षणिक परिणाम गंभीर असू शकतात. त्यामुळे संस्थांनी एआयच्या वापराबाबत स्पष्ट नियम, विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना आणि उल्लंघन झाल्यास न्याय्य प्रक्रिया निश्चित करण्याची वेळ आली आहे.

शिक्षकांना विद्यार्थ्यांना पकडण्याची भीती आणि विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून अन्याय होण्याची भीती, दोन्ही परिस्थिती शिक्षणासाठी घातक आहेत. या दोन्ही भीतींच्या पलीकडे जाऊन विश्वासाचे वातावरण निर्माण करावे लागेल.

आयआयटी ही देशाची बौद्धिक संपत्ती आहे. अशा संस्थांमध्ये आंदोलन झाले म्हणून संस्था कमकुवत होत नाही; परंतु संवाद संपला, नियमांची विश्वासार्हता ढासळली आणि प्रत्येक वादाला राजकीय अथवा जातीय संघर्षाचे स्वरूप आले, तर नुकसान नक्कीच होते.

या संपूर्ण प्रकरणात दोषारोपांच्या स्पर्धेपेक्षा सत्यशोधनाची गरज आहे. चौकशी निष्पक्ष व्हावी, संबंधित सर्वांचे म्हणणे ऐकले जावे, चुकीची माहिती मागे घेतली जावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संस्थात्मक सुधारणा केल्या जाव्यात. विद्यार्थ्यांचे मानसिक आणि शैक्षणिक कल्याण, शिक्षकांची स्वायत्तता, परीक्षेची शुचिता आणि सामाजिक न्याय, या चारही गोष्टी एकत्र जपल्या गेल्या तरच शिक्षणव्यवस्था मजबूत होईल.

आयआयटीचे खरे सामर्थ्य केवळ प्रयोगशाळांमध्ये नाही; ते ज्ञान, शिस्त, विवेक, न्याय आणि संवादाच्या संस्कृतीत आहे. या कसोटीवर आपण सर्वांनीच आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. संस्थेची प्रतिष्ठा वाचविण्याचा मार्ग कोणत्याही एका गटाच्या विजयातून नव्हे, तर सत्य, न्याय आणि संवेदनशीलतेच्या समतोलातून जातो.

# व्यंकटेश तरुण मंडळाच्या देखाव्याचे दिमाखदार उद्घाटन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहरातील व्यंकटेश गणेश तरुण मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा सजीव देखावा साकारण्यात आला असून, तो नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. या देखाव्याचे उद्घाटन आमदार प्राजक्त तनपुरे, श्रीरामपूर विभागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, गटनेते हर्ष तनपुरे, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विद्या पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी माजी नगराध्यक्ष आसाराम शेजूळ, मंडळाचे संस्थापक मार्गदर्शक रावसाहेब चाचा तनपुरे, नगरसेवक प्रतीक तनपुरे आदी उपस्थित होते. पोलीस उपविभागीय अधिकारी जयदत्त भवर यांनी व्यंकटेश तरुण मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्याबरोबरच समाजाला सकारात्मक संदेश देण्याचे काम अशा उपक्रमांतून होत असल्याचे त्यांनी सांगितले.

संभाजी महाराजांच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंगांचे सजीव सादरीकरण, भव्य आरास आणि प्रभावी मांडणी पाहण्यासाठी राहुरी शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. देखाव्यामुळे गणेशोत्सवाच्या उत्साहात भर पडली आहे.

दरम्यान, राहुरी शहरातील विविध गणेश मंडळांनी यंदा धार्मिक, ऐतिहासिक व पौराणिक विषयांवरील देखावे साकारले आहेत. मळगंगा तरुण मंडळाकडून मार्कंडेय ऋषींची अमर कथा, बुवासिद्धदेव मंडळाकडून भुताची गुफा, छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाकडून ज्वालासुराचा जन्म व वध, वाल्मीक तरुण मंडळाकडून खंडोबाचा महिमा, तर श्रीदत्त तरुण मंडळाकडून कुंभकर्णाचा वध असे देखावे साकारण्यात आले आहेत. हे देखावे पाहण्यासाठी गणेशभक्तांची गर्दी वाढत आहे.

# ‘विकसित भारत २०४७’च्या संकल्पनेतून प्रवरा सिंधूछाया कॅम्पसमध्ये गणेशोत्सव

### शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान व राष्ट्रनिर्मितीचा अनोखा संगम



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : परंपरा, संस्कृती आणि आधुनिक शिक्षणाची सांगड घालत ‘विकसित भारत २०४७’ या संकल्पनेतून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या चिंचोली (नाशिक) येथील प्रवरा सिंधूछाया शैक्षणिक संकुलात गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. १४ सप्टेंबर रोजी श्री गणेशमूर्तीची शास्त्रोक्त पद्धतीने स्थापना करून उत्सवाची सुरुवात झाली. यावेळी साकारलेल्या आकर्षक देखाव्यात भारताचा नकाशा केंद्रस्थानी ठेवून ‘विकसित भारत २०४७’ची संकल्पना मांडण्यात आली. शिक्षण, आरोग्य, फार्मसी, कृषी, अभियांत्रिकी, संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डिजिटल तंत्रज्ञान व नवोपक्रमाच्या माध्यमातून विकसित भारताची वाटचाल विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेने साकारली. युवा शक्तीला राष्ट्रनिर्मितीच्या केंद्रस्थानी ठेवत शिक्षण, कौशल्य, संशोधन, नवोपक्रम व उद्योजकतेच्या माध्यमातून युवकांनी योगदान द्यावे, असा संदेश देण्यात आला. उत्सवादरम्यान क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, श्री सत्यनारायण महापूजा, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व स्वयंसेवकांनी उत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# माहितीचा अधिकार मागितल्याने त्रास दिल्याचा आरोप !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिंगणापूर** : माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मागण्यासाठी नेवासा तालुका कृषी कार्यालयात गेलेल्या नागरिकाला अपमानास्पद वागणूक देऊन त्रास दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी सोनई येथील सचिन नामदेव साळवे यांनी कृषी आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, ३० ऑगस्ट २०२६ रोजी साळवे हे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अभिलेख वाचनासाठी नेवासा तालुका कृषी कार्यालयात गेले होते. त्यावेळी कार्यालयातील सहाय्यक अधीक्षक अरुण लक्ष्मण उन्हाळे यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली तसेच त्यांच्याशी एकतर्फी पद्धतीने वर्तन करून कार्यालयाबाहेर जाण्यास सांगितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

माहितीच्या अधिकाराबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार केल्यानंतरही आपल्याला त्रास दिला जात असल्याचा दावा साळवे यांनी केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करून कार्यालयातील लेखाजोखा, आर्थिक व्यवहार व संबंधित अभिलेखांची तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आपल्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे.

# पावन गणेश मित्र मंडळाला शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार यांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : भंडारा कार्यक्रमाच्या निमित्ताने नेवासा येथील पावन गणपती मंदिर प्रांगणातील २८ वर्षाची परंपरा असलेल्या पावन गणेश मित्र मंडळाला शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रामदास भाऊ गोल्हार यांनी भेट देऊन मंडळाच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी पावन गणपती मंदिराच्या वतीने सेवेकरी दत्तात्रय गायकवाड व पावन गणेश मित्र मंडळाच्या वतीने अध्यक्ष नारायणभाऊ लष्करे यांच्या वतीने शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास भाऊ गोल्हार यांचा सत्काराच्या माध्यमातून सन्मान करण्यात आला.यावेळी रस्त्यावर उभारण्यात आलेल्या पावन गणेश विद्युत फलकाचे अनावरण रामदास गोल्हार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी शिवसेनेचे मार्गदर्शक बिट्टूभाऊ लष्करे, तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण,शिवसेनेचे युवा नेते व मंडळाचे मार्गदर्शक नारायण लष्करे,अशोक उपळकर,गोरख घुले,कैलास लष्करे,बालूभाऊ घुले,किशोर तट्टू,शांतवन खंडागळे यांच्या वतीने रामदास गोल्हार यांची शिवसेना जिल्हा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी राहुल सुर्यवंशी,माऊली देवकाते,शिवनाथ चावरे,संदीप धनवटे, प्रशांत निपुंगे,बंडू आरले,जालिंदर लष्करे,विलास लष्करे,ऋषिकेश लष्करे, तेजस पवार, महेश आघाडे, तोफिक पठाण, आदित्य तोडमल,आदित्य चक्रनारायण, चेअरमन मच्छिंद्र कडू,




पवन लष्करे,प्रतीक बिडकर,सागर काळे,रवी लष्करे,राम लष्करे,आकाश लष्करे,रवी कुसळकर,सागर गुंजाळ, घनश्याम लष्करे, गणेश कुसळकर,सनेल कुसळकर, चैतन्य लष्करे,गणेश लष्करे,निवृत्ती लष्करे उपस्थित होते

श्री पावन गणपती हे जागृत दैवत असून माझे श्रध्दास्थान असल्याचे सांगत पावन गणेश मित्र मंडळाचे गणेशोत्सवाची परंपरा जपत २८ वर्षात प्रबोधन व धर्म जनजागृतीचे काम केले असल्याचे गौरवोदगार रामदास गोल्हार यांनी यांनी यावेळी बोलतांना काढले.यावेळी पावन गणेश मित्र मंडळाच्या वतीने आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# ना. विखे यांचे कार्य मानवी मनाचे उत्तम उदाहरण : डॉ. ढगे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : जलसंपदा व अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे कार्य मानवी मनाचे उत्तम उदाहरण असल्याची प्रतिक्रिया कृषी शास्त्रज्ञ व कृषी स्तंभ लेखक नेवासा तालुक्यातील खेडले काजळी गावचे सुपुत्र डॉ.अशोक ढगे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना दिली.

डॉ ढगे म्हणाले की आंदोलन हा लोकशाहीचा एक घटक आहे,जनतेच्या मागण्या सरकार समोर मांडणीद्वारे मांडणे हा संविधानातील मूलभूत हक्क आहे. लोकशाहीची पथ्ये आंदोलकांनी व सरकारने पाळणे याला तात्विक मूल्य आहे. सप्टेंबर २०२६ मधील मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे दादा यांनी तीव्र स्वरूपात केले महाराष्ट्र शासनाच्या मंत्रिमंडळातील ज्येष्ठ कॅबिनेट मंत्री व उपसमितीचे अध्यक्ष नामदार डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील यांनी अत्यंत कौशल्य पद्धतीने हाताळले.

या सर्व पार्श्वभूमीवर जरांगे यांनी १९ दिवस उपोषण केल्यामुळे त्यांची प्रकृती खूपच खालावली असल्यामुळे छत्रपती संभाजीनगर येथे ते गॅलेक्सी रुग्णालयात उपचार घेतले त्यावेळी नामदार विखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात जाऊन श्री जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस केली

नामदार विखे पाटील यांनी मनातील कटूता न ठेवता व द्वेष बाजूला ठेवून माणुसकीचे व मानवी मनाचे उत्तम उदाहरण समाजापुढे ठेवून आदर्श निर्माण केला. लोकशाहीची प्रक्रिया घडत असताना विरोधी विचारांच्या आंदोलकांचा आदर करून उदात्त मनाने पुढील विचारपूर्वक क्रिया नामदार डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली त्यामुळे त्यांचे अभिनंदन करणे अभिमानाची गोष्ट आहे. आपल्या देशात आपण लोकशाही स्वीकारली असून संविधानाच्या पाया या उदाहरणाने अधोरेखित झाला आहे असे प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी केले आहे.

# हरेगावात ग्लोबल डिफेन्स इंडस्ट्रीजच्या प्रकल्पाचे आज भूमिपूजन

## राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे ग्लोबल डिफेन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या प्रस्तावित दारूगोळा निर्मिती व बायो-सीएनजी संकुलाचा भूमिपूजन समारंभ आज, दि. २४ सप्टेंबर रोजी होणार आहे. शेती महामंडळाच्या ए ब्लॉक वाडी येथे दुपारी १२.३० वाजता भूमिपूजन करण्यात येणार असून, त्यानंतर संत तेरेजा चर्च, हरेगाव मतमाऊली भक्तिस्थानाच्या प्रांगणात कार्यक्रम होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जलसंपदा व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. प्रस्तावित प्रकल्पात दारूगोळा, स्फोटके व अन्य संरक्षणविषयक उत्पादनांची निर्मिती करण्याबरोबरच बायो-सीएनजीच्या माध्यमातून हरित ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येणार आहे. कंपनीचे नाव यापूर्वी निबे ऑर्डनन्स अँड मेरीटाइम लिमिटेड होते; फेब्रुवारी २०२६ मध्ये कंपनीचे नाव ग्लोबल डिफेन्स





इंडस्ट्रीज लिमिटेड करण्यात आले आहे.

या प्रकल्पामुळे परिसरातील उद्योगांना चालना मिळण्याबरोबरच स्थानिक युवकांसाठी रोजगार व कौशल्यविकासाच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. कार्यक्रमास नागरिक, शेतकरी, प्रशासनातील अधिकारी तसेच कंपनीचे विविध भागधारक उपस्थित राहणार आहेत. सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गणेश निबे, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्यासह पदाधिकारी व मान्यवरांनी केले आहे.

# सखोल ज्ञान, योग्य निदान हाच आरोग्यसेवेचा पाया : डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** :आयुर्वेद ही केवळ आजारांवरील उपचारपद्धती नसून निरोगी व संतुलित जीवन जगण्याची शास्त्रीय आणि सर्वांगीण जीवनपद्धती आहे. उपचार सुरू करण्यापूर्वी आजाराचे सखोल ज्ञान, अचूक निदान तसेच रुग्णाची प्रकृती, जीवनशैली व आहार यांचा सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे. उपचारापूर्वी सखोल ज्ञान व योग्य निदान हा आरोग्यसेवेचा महत्त्वाचा पाया आहे, असे प्रतिपादन पायरेन्सच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांनी केले. आयुर्वेद दिनानिमित्त विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक महाविद्यालयात आयोजित आरोग्य जनजागृती कार्यक्रमात त्या बोलत होत्या. धकाधकीची जीवनशैली, अनियमित आहार, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव व मानसिक ताण यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार करण्याबरोबरच प्रतिबंधात्मक आरोग्यदृष्टी अंगीकारणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

आयुर्वेदातील रुग्णकेंद्री उपचारपद्धतीचे महत्त्व स्पष्ट करताना प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, जीवनशैली व आरोग्यस्थिती वेगळी असल्याने संपूर्ण माहिती जाणून योग्य उपचारपद्धती निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी संस्थेचे सचिव व संचालक डॉ. निलेश बनकर, प्राचार्या डॉ. कल्पना साठे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण व पथनाट्याद्वारे आरोग्यविषयक जनजागृती केली. तसेच मोफत हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. डॉ. श्याम भुतडा यांनी निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. दिपाली पवार व डॉ. वैशाली काळेबाग यांनी केले.

# उंबरी बाळापूर येथे मतमाऊली यात्रोत्सवास प्रारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या मतमाऊली यात्रा उत्सवास बुधवारपासून भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. यंदा यात्रेचे हे अमृत महोत्सवानंतरचे ७७ वे वर्ष असून, यानिमित्त ख्रिस्त राजा चर्च प्रांगणात बुधवार ते शनिवार दरम्यान चार दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा कमिटीच्या वतीने या संपूर्ण सोहळ्याची चोख तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

यात्रोत्सवानिमित्त बुधवार ते शुक्रवार दरम्यान दररोज सायंकाळी विशेष मिस्सा आणि प्रवचन होणार आहे. यामध्ये बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी रे. फा. प्रमोद बोधक, गुरुवार, दि. २४ सप्टेंबर रोजी रे. फा. प्रशांत शाहराव, तर शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी फादर अँड्रयू जाधव हे मिस्सा व प्रवचन देणार आहेत. या धार्मिक विधीनंतर दररोज भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. यात्रेच्या मुख्य दिवशी, शनिवार दि. २६ सप्टेंबर रोजी फादर पीटर डिसूझा यांचे विशेष प्रवचन व मिस्सा विधी संपन्न होणार असून, त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या मुख्य सोहळ्यास फादर ज्यो. गायकवाड, फादर ख्रिस्तफोर शेळके, फादर विनोद शेळके, फादर राजू शेळके, फादर अजय शेळके, फादर फ्रान्सिस पटेकर, फादर रॉबर्ट दास, फादर आबा वाघमारे, फादर नेल्सन परेरा, फादर नेव्हेल फर्नांडिस, डी. रोशन, सिस्टर अर्चना बागुल, सिस्टर ज्योती शेळके यांच्यासह संगमनेर येथील ‘जिजस अँड मेरी’, घुलेवाडी येथील ‘आशातारा’ व पानोडी येथील ‘होली क्रॉस’ कॉन्व्हेंटच्या सिस्टर्स आणि विविध मान्यवर धर्मगुरू उपस्थित राहणार आहेत.

# शेतकरी-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या पत्रकारांचा सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्याने वाचा फोडत, त्यांच्या समस्या शासन-प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणाऱ्या पत्रकारांचा क्रांतीसेनेच्या वतीने राहुरी फॅक्टरी येथे सन्मान करण्यात आला. पत्रकारितेसह सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरस्कारप्राप्त मान्यवरांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

राहुरी तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार सुधाकर कराळे, रफीकभाई शेख, राजेंद्र उंडे व रियाजभाई देशमुख यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल ‘पत्रकारितारत्न’ पुरस्कार तसेच स्व. वसंतराव देशमुख जिल्हास्तरीय पत्रकार पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल क्रांतीसेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच क्रांतीसेनेचे मार्गदर्शक व शिवसेना जिल्हा उपप्रमुख आण्णासाहेबम्हसे यांना ‘समाजरत्न’ पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले.ग्रामीण भागातील पत्रकारिता ही केवळ बातमी देण्यापुरती मर्यादित नसून, शेतकरी आणि




सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठीचा संघर्ष आहे, असे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर वेळप्रसंगी आक्रमक भूमिका घेत शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम पुरस्कारप्राप्त पत्रकारांनी केले आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत क्रांतीसेनेच्या वतीने सन्मान करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

यावेळी दादासाहेब पवार, मधुकर म्हसे, रफीकभाई शेख आणि अशोकराव घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामीण पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. पुरस्कार ही केवळ व्यक्तीच्या कार्याची पावती नसून समाजातील प्रश्नांसाठी सुरू असलेल्या पत्रकारितेच्या लढ्याला मिळालेली दाद असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी राहुरी कारखान्याचे माजी डिस्टिलरी मॅनेजर बबनराव धोंडे, क्रांतीसेना संपर्कप्रमुख मधुकर म्हसे, सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब पवार, युवा जिल्हा उपाध्यक्ष शेखर पवार, पत्रकार राजेंद्र परदेशी, धर्मेद्र मुसमाडे, दत्तात्रय हिवाळे, विक्रम मोढे, हर्षद धोंडे, पुरुषोत्तम मुसमाडे, वैभव संकलेचा, संजय मुसमाडे, अशोक घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दादासाहेब पवार यांनी केले. पुरस्कारप्राप्त पत्रकारांचा सन्मान झाल्याबद्दल

उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### फिन्स स्विमिंगमध्ये प्रवरा पब्लिक स्कूल यश उमेर शेखची राष्ट्रीय पातळीवर निवड



**लोणी** : नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय फिन्स स्विमिंग स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचा इयत्ता सातवीतील विद्यार्थी उमेर शेख याने उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करत राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी आपली निवड केली आहे. फिन्स जलतरणातील बायो फिन्स तसेच सर्फेस स्विमिंग या प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली. अंडरवॉटर स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया व अंडरवॉटर स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने सहाव्या राज्यस्तरीय फिन्स स्विमिंग स्पर्धेचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या विविध भागांतून सुमारे ३५० जलतरणपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर, संभाजीनगर, अमरावती, कोकण व सोलापूर विभागातील जलतरणपटूंचा या स्पर्धेत सहभाग होता. या स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरा नगरच्या इयत्ता सातवीतील उमेर शेख याने उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय फिन्स स्विमिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. उमेरला क्रीडा संचालक अफजल पटेल व दीपक जाधव तसेच जलतरण प्रशिक्षिका योगिता तनपुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### डॉ. धनंजय देशमुख यांना डॉक्टरेट पदवी प्राप्त

**आश्वि** : मांची हिल : अश्विन कॉलेज ऑफ फार्मसी, मांची हिलचे प्राचार्य मा. डॉ. धनंजय देशमुख सर यांनी पारुल युनिव्हर्सिटी वडोदरा गुजरात या विद्यापीठाअंतर्गत डॉक्टरेट (झह.ऊ) पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल मांची हिल संस्थेच्या व्यवस्थापनाच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी, संशोधनवृत्ती आणि ज्ञानसाधनेचे हे फलित असल्याचे व्यवस्थापनाच्या वतीने सांगण्यात आले. शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील त्यांच्या या यशाबद्दल संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थीवर्गातूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक, संशोधनात्मक व सामाजिक कार्यासाठी संस्थेचे संस्थापक ॲड. शाळीग्राम होडगर, संस्थेचे विश्वस्त डॉ. शैलेन्द्रसिंह होडगर व डॉ. दिग्विजयसिंह होडगर, उपाध्यक्ष अण्णासाहेब बलमे, जनरल मॅनेजर किसन हजारे, सचिव गुणे निलिमा, संचालक डॉ. संजीव लोखंडे तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मांची हिल संस्थानच्या वतीने या यशाबद्दल अभिनंदन केले.

### म्हाळस पिंपळगाव ते कारेगाव रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी खा.वाकचौरे यांना निवेदन



**चांदा** : नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव ते कारेगाव या रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी म्हाळस पिंपळगाव कारेगाव येथील ग्रामस्थांच्या वतीने शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना शंभर सह्यांचे निवेदन नुकतेच शिर्डी येथील त्यांच्या निवासस्थानी देण्यात आले असल्याची माहिती म्हाळस पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सुनिल कर्डीले यांनी दिली. त्यांनी या निवेदनात नमूद केले आहे की या रस्त्याने असंख्य विद्यार्थी काही सायकलवर तर काही पायी प्रवास करतात तसेच अनेक शेतकऱ्यांची देखील याच रस्त्याने वर्दळ असते तसेच या भागातील नागरीकांना ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे जाण्यासाठी हा मार्ग सोईस्कर आहे. या रस्त्यात खड्डे पडल्यामुळे अपघाताचे धोके वाढतच आहे तसेच वेड्या बाभळीने या रस्त्यात अतिक्रमण केले आहे. लवकरात लवकर खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावून या भागातील नागरीकांची रस्त्याच्यी अडचण दूर करावी अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली आहे.

### सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जगधने यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



**राहुरी** : राहुरी शहरातील सामाजिक कार्यकर्ते व लक्ष्मीनगर येथील श्रीदत्त तरुण मंडळाचे माजी अध्यक्ष राजेंद्र बाळासाहेब जगधने (वय ३६) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. त्यांच्या अकाली निधनाने रहरी शहरात हळहळ व्यक्त होत आहे. राजेंद्र जगधने यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. ते समाजसेवक वसंत आनंदा जगधने यांचे पुतणे, तसेच नगरसेवक सोन्याबापू जगधणे यांचे बंधू होते. राजुभाऊ हे अत्यंत मनमिळाऊ व धार्मिक स्वाभावाचे होते.

# लोकनियुक्त नगराध्यक्षाला मंजुरी शिवाय कोणत्याही खर्चाला मान्यता नसते : आ. प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपुर** : मतदारांनी निवडून दिल्यानंतर त्यांच्या मागण्या मान्य करणे इतके अवघड आहे की कायद्याच्या चौकटीत त्या सोडवणे बऱ्याच वेळा अवघड व अशक्य असतात याचा अनुभव मला असल्याने शासन व प्रत्यक्ष समस्या यामधील माध्यम म्हणून सरकार पुढे मांडण्याचा मी प्रयत्न करीन असे विचार माजी मंत्री व स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधित्व करणारे विद्यमान आमदार प्राजक्त तनपुरे यांनी मांडले. श्रीरामपूर नगर परिषदेने आयोजित केलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

नगरपरिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पालिकेत निवडून आलेले नगरसेवक , नगराध्यक्ष करण ससाणे, मुख्याधिकारी मनोज उकिरडे आदि उपस्थित होते. शासनाचे सॉफ्टवेअर वेळेवर चालत नाहीत त्यामुळे नागरिकांना व काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मनस्ताप होतो. दैनंदिन कामासाठी लागणारे दाखले सुद्धा नागरिकांना वेळेवर देता येत नाहीत. पोर्टलच्या समस्या शासनाने त्वरित अपडेट करून सोडविल्या पाहिजेत . सोलर चा वापर हा दिवसाच्या ठराविक वेळेनुसार वीज मंडळ आकारते त्यामुळे सोलरचा उपयोग पालिकेला व नागरिकांना म्हणावा तसा होत नाही याबाबतही आपण नागरिकांच्या वतीने म्हणणे मांडणार आहोत. कुत्र्यांपासून नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यामध्ये प्राणी संरक्षक घटकांकडून त्रास होतो या समस्येवर सुद्धा शासनाने विचार केला पाहिजे हे पण म्हणणे आपण मांडणार आहोत. श्रीरामपूर शहराच्या विकासासाठी काही प्रमाणात निधी देण्याबाबत आपण निश्चित विचार करू असेही श्री प्राजक्त तनपुरे म्हणाले. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्या मुळे मला आमदारकीची संधी मिळाली याबद्दल त्यांनी ससाणे यांचे आभार मानले.

अनुकंपातत्त्वावर नियुक्ती पात्र असलेल्या उमेदवारांना तनपुरे यांच्या हस्ते नेमणूक पत्रे वाटण्यात आली. नगरपालिकेला वसुलीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या करातून पालिका चालवणे अवघड आहे,जन्म मृत्यूचे दाखले पालिका वेळेत उपलब्ध करून देऊ शकत नाहीयामागे शासनाचा हलगर्जीपणा आहे. जास्तीत जास्त निधी श्रीरामपूर पालिकेला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत,आमच्या पालिकेचे प्रश्न तुम्ही शासन दरबारी मांडा,निवडणुका होऊन बरेच दिवस झाले परंतु आम्ही नागरिकांच्या समस्या निधी अभावी सोडवू शकत नाही, ही सर्व नगरसेवकांची समस्या आहे,उत्पन्नापेक्षा खर्चाचा आकडा मोठा आहे,नागरिकांची कामे आम्ही करू शकत नसल्याने नागरिकांकडून नगरसेवकांना मानसन्मान मिळत नाही.

विजेची समस्या आम्ही सोडू शकत नाही पण वीज समस्येमुळे नागरिक त्रस्त आहेत या कामी लक्ष घालावे,नगरसेवकांचे मानधन वाढवावे,जन्म मृत्यूची शासनाने बंद केलेली सेवा पूर्ववत सुरू करा,नवीन घंटागाड्या खरेदीसाठी निधी द्या वसुलीवरील २४ टक्के व्याज बंद करा,अग्निशमन सेवेसाठी केवळ ३०० लिटर पाणी मिळणाऱ्या गाड्या कुचकामी आहेत त्या ऐवजी ४००० लिटरच्या पाण्याच्या गाड्या पालिकेला द्या,शहराच्या विकासासाठी विकत घ्यावयाच्या मैदानासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला पाहिजे,शहरातील बड्या आस्थापनांकडे नगरपालिकेचे सुमारे दोन कोटी १८ लाख रुपयांची थकबाकीवसुलीसाठी शासनाने मार्गदर्शन करावे,यात रेल्वे, पोलीस ,एसटी यांचा समावेश आहे.मोकाट कुत्र्यांची समस्या ही नगरपालिकेला मोठी डोकेदुखी आहे कचरा डेपोकडे पालिकेने एकेका खोलीत २० २५ कुत्री ठेवली आहे त्यांच्या निर्बिजीकरणावर व त्यांच्या खाण्यापिण्यावर मोठा खर्च होतो पण त्याची कुठेही तरतूद नाही.

शहरातील पुलांची रुंदी वाढवायची असल्याने त्यासाठीही निधी उपलब्ध करून द्यावा अशा अनेक मागण्या नगरसेवकांनी व नगराध्यक्ष करण ससाने यांनी मांडल्या पालिकेचे मुख्याधिकारी उकिरडे म्हणाले पालिकेमधील अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने कामे होऊ शकत नाही ती रिक्त पदे त्वरित भरण्याची व्यवस्था झाली पाहिजे,शहर नगररचना विभाग तसेंच अनिशमन विभागानी रिक्त पदे भरण्याचे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. चर्चेमध्ये नमरसेवक दिलीप नागरे, राजेंद्र पवार, लकीसेठी, कलिम कुरेशी, डॉ. दिलिप शिरसाठ, आशा परदेशी, महिला व बालविकास समितीच्या अध्यक्षा शिवसेना गटनेत्या मंजुश्री मुरकुटे, योगिता नागले, सोनिया कक्कड, स्नेहल खोरे आदिंनी भाग घेतला. शेवटी ज्येष्ठ नगरसेवक आशिष धनवटे यांनी आभार मानले. आ. तनपुरे यांनी शहराचा मानाचा आझाद मैदान गणपतीचे दर्शन घेतले.

## प्रगतीची वाटचाल अधिक गतिमान करा : आ. आशुतोष काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या कामगार पतपेढीच्या प्रगतीमध्ये संस्थेच्या सभासदांचा मोठा आणि मोलाचा वाटा आहे. संस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी यंत्रणा नसून तिच्याशी जोडलेल्या प्रत्येक सभासदांच्या कष्टातून तिची खरी ताकद निर्माण होत असते. संस्थेच्या प्रगतीसाठी कारखान्याच्या माध्यमातून आवश्यक असणारे सर्वो तोपरी सहकार्य केले जात आहे.

त्यामुळे सभासदांचे हित, सभासदांचा विश्वास आणि संस्थेची आर्थिक शिस्त यांचा समन्वय साधत पतपेढीची प्रगतीची वाटचाल अधिक गतिमान करावी असा मौलिक सल्ला आ.आशुतोष काळे यांनी दिला. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतपेढी या संस्थेची ६९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच आ.आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व संस्थेचे चेअरमन प्रमोद आभाळे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संस्थेच्या कर्मवीर शंकरराव काळे सभागृहात पार पडली.याप्रसंगी उपस्थित संचालक मंडळाला मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. अध्यक्षपदाची सुचना राहुल थोरात यांनी मांडली. या सूचनेस कृष्णा भोसले यांनी अनुमोदन दिले.

श्रद्धांजली ठरावाचे वाचन संचालक संदीप आढाव यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद आभाळे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. संस्थेला सर्व प्रकारच्या मिळालेल्या उत्पन्नातून संस्थेला २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण २६ लाख ७१ हजार रुपयांचा नफा झाला असून ऑडीट वर्ग 'अ' मिळाला आहे.सालाबादप्रमाणे याहीवर्षी सभासदांना १०% लाभांश देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.बदलत्या काळानुसार संस्थेच्या कारभारात अधिकची पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाईन पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जास्त ठेव ठेवणाऱ्या व जास्तीत जास्त लाभांश घेणाऱ्या सभासदांचा आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.अहवाल वाचन मॅनेजर कुलदीप गांगुर्डे यांनी केले. सभेपुढे मांडण्यात आलेले १ ते १२ विषय सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजूर केले.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन दिनार कुदळे, कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, सेक्रेटरी बाबा सय्यद, कामगार सेक्रेटरी नितीन गुरसळ आदी मान्यवरांसह संस्थेचे सर्व सभासद कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्हा.चेअरमन वैभव काळे यांनी केले तर आभार संचालक संजय पोथारे यांनी मानले.

## अमृतवाहिनीच्या सिव्हिल विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धांत दमदार कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : पुणे येथील अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे इंजिनिअर्स डे व नॅशनल काँक्रीट डे २०२६ निमित्त आयोजित राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धांमध्ये अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. विविध सात स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सात ट्रॉफींसह एकूण ४१ हजार ५०० रुपयांची रोख पारितोषिके मिळविली. ग्रीन काँक्रीट मिक्स डिझाईन स्पर्धेत दर्शन मालटकर, मयुरेश नारोटे, जय कडाळे, रितेश राठोड व तन्मय आव्हाळे यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवत १० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. काँक्रीट क्यूब टेस्टिंगमध्ये सूरज झोडगे, तुषार पवार, साहिल उगलमुगले, सिद्धांत शिंदे व संकेत वाबळे यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवून ७ हजार ५०० रुपये मिळविले. सर्व्हेइंग लाइन-आऊट, टेक्निकल क्विझ, क्यूब टेस्टिंग व आईस्क्रीम स्टिक ब्रिज या चार स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला. ऑटो कॅड स्पर्धेत समृद्धी दातीर हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष लोकनेते बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, व्यवस्थापकीय विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर यांच्यासह विभागप्रमुख व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ३२ वर्षांच्या शैक्षणिक सेवेला राज्यस्तरीय गौरव

### मीनाताई जगधने यांना 'ग्रीन वर्ल्ड शिक्षण रत्न' पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



श्रीरामपूर : शिक्षण हे केवळ ज्ञानदानाचे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विचाराला कृतीची जोड देत ३२ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या मीनाताई माणिकराव जगधने यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. ग्रीन वर्ल्ड संस्थेतर्फे त्यांना 'ग्रीन वर्ल्ड डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षण रत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १९९२ पासून कार्यरत असलेल्या जगधने यांनी वंचित, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले. श्रीरामपूर येथील कांतिज्योती सावित्रीबाई फुले बालवाडी, प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्राच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात विविध प्रयोग केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, गुणवत्तावाढीसाठी उपक्रम राबविणे आणि पालक-विद्यार्थी संवाद वाढविण्यावर त्यांनी भर दिला.

आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दत्तक पालक योजना राबविण्यात आली. तसेच दहावीमध्ये अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाची संधी देण्यासाठी 'प्रगती विद्यालय' हा उपक्रम सुरू करण्यात आला. महिला सक्षमीकरण व समाजप्रबोधनातही त्यांनी योगदान दिले.

रविवार, २७ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता पुण्यातील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, नऱ्हे-आंबेगाव येथे पुरस्कार सोहळा होणार आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त आयुक्त खिलारे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## गणेश मंडळाला धर्मवीर संभाजी महाराज यांचे नाव दिल्याचे सार्थक : आ. खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**संगमनेर** : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज हे नाव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सुमारे दहा वर्षांपूर्वी निश्चित केले होते. त्या वेळी निश्चित केलेल्या या नावामागील इतिहास आणि धर्मवीर संभाजी महाराजांचे कार्य आजच्या पिढी समोर मांडण्याचे काम मंडळाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे मंडळाने दिलेले नाव आणि त्या मागील विचार आज खऱ्या अर्थाने सार्थक होत असल्याचे गौरवोद्गार आ.अमोल खताळ यांनी काढले.

संगमनेर शहरालगत घुलेवाडी रोड येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तरुण मित्र मंडळाच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त हिंदुत्ववादी कीर्तनकार अनिल महाराज देवळेकर यांचे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी गणेशभक्तांना मार्गदर्शन करताना आ. खताळ म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने कार्यरत असलेल्या या दहा वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या छोट्या मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणेशोत्सवा च्या माध्यमातून इतिहास, संस्कृती व राष्ट्रभक्तीचा विचार पुढे नेण्याचे काम केले आहे. त्यांचे हे कार्य असेच पुढे वाढत जावे अशा सदिच्छा आमदार खताळ यांनी व्यक्त केल्या यावेळी आमदार अमोल खताळ पा. यांच्या हस्ते अनिल महाराज देवळेकर यांचा सन्मान करण्यात आला यावेळी गणेश मंडळाचे ज्येष्ठ तरुण कार्यकर्ते यांच्यासह गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शहागडावर ५ दिवसाचे सांस्कृतिक कार्यक्रम होणार

संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथे शहाजी महाराज यांनी स्वराज्याचा संकल्प केला असून हि भूमी स्वराज्य संकल्पभूमी म्हणून विकसितकरायची आहे.त्यासाठी आपला शासन दरबारी प्रयत्न सुरू आहे महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून शहागडाच्या विकासा साठी दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीने शहागडावर पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रम हि आयोजित करण्यात येणारआहे,अशी माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली.

# संगमनेर तालुक्याला २०० विज रोहित्र उपलब्ध करुन दिले : शेतकऱ्यांमध्ये समाधान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**संगमनेर** : भारनियमनाच्या संकटात महायुती सरकारने तालुक्याला २००रोहीत्रांची उपलब्धता करून दिली आहे. पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटीलआणि आ.अमोल खताळ यांच्या माध्यमातून नादुरूस्त रोहीत्र बदलून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न झाले आहेत.विशेष म्हणजे ट्रान्स फॉर्मर जळाल्यानंतर कमी कालावधीमध्ये शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार येवू न देता कार्यवाही झाल्याचे समाधान ग्रामीण भागात व्यक्त होत आहे. मागील काही दिवसांपासून विजेच्या भारनियमानाच्या त्रासाला शेतकरी वर्गाला सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी रोहीत्र नादुरूस्त होण्याचे प्रकार घडल्याने शेतीसह ग्रामीण भागाचा वीज पुरवठा खंडीत झाला.अनेक गावांनी रोहीत्र नव्याने बसून देण्याची किंवा रोहीत्रावरील भार वाढवून देण्याची मागणी वाढली होती.

शेतकऱ्यांची वीज समस्या लक्षात घेवून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तालुक्यासाठी १२५ रोहीत्र उपलब्ध करून दिले. आ. अमोल खताळ यांच्या पाठपुराव्यामुळे ८० नविन रोहीत्र नव्याने बसविण्यात आल्याने शेतकऱ्यांची वीजेची समस्या दूर करण्यात यश आले.

१ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर २०२६ या ४८ दिसवात मागणी प्रमाणे रोहीत्र उपलब्ध करून देण्याचे मोठे काम महायुती सरकार च्या माध्यामातून झाले आहे. आणखी ४० रोहीत्र काही दिवसात उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. संगमनेर तालुक्यातील डोळासणे, मेंढवण,मेंगाळवाडी या गावातील वाड्या वस्त्याना अनेक वर्ष वीज पुरवठा झालेला नव्हता या गावांसाठी पालकमंत्री विखे पाटील यांच्या सहकार्याने आणि आ.अमोल खताळ यांच्या पाठपुराव्याने पहील्यांदा वीज पुरवठा होवू शकला आहे. यंदाच्या वर्षी पाऊस कमी प्रमाणात झाल्याने वीजेची उपलब्धता तसेच वितरण व्यवस्थेचे असलेले आव्हान मोठे आहे.

यातूनही मार्ग काढण्या साठी आ.अमोल खताळ यांनी वीज वितरण कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

> विजेचे भारनियमन कमी व्हावे याकरीता अभियंत्यांशी सातत्याने संपर्कात असून,मागील दोन दिवसां पासून भारनियमन कमी होत आहे. गावठाण फिडरवर ए जी फिडर जोडले जात असल्याने सांयकाळी सहा ते नऊ या कालावधीत भार नियमन वाढत होते. गावठाण फिडरवर येणारा एजीचा भार कमी व्हावा म्हणून हे फिडर स्वतंत्र करण्याची प्रक्रीया सुरू झाली असून, गावठाण फिडर सिंगल फेज करण्याबाबत तात्तडीने सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.
>
> **अमोल खताळ, आमदार संगमनेर विधानसभा**

**जाहिर नोटीस**

ॲड. ए.पी. उंबरकर
ने.ता. २३/१०/२०२६

दिवाणी न्यायालय क स्तर राहाता
राहाता येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब (ज्यु.डी.) यांचे कोर्टात...
वारस चौ. अर्ज नंबर ७६/२०२६

नि.६

१. अनिल एकनाथ कडु, वय ४३ वर्षे धंदा - शेती, मो.नं. ८००७५१४३३५

२. योगेश एकनाथ कडु, वय ४१ वर्षे धंदा - शेती, मो.नं. ९३०७३८७५४७ वरील दोघेही रा. कडु वस्ती, पाथरे बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर---**अर्जदार**

विरुध्द

कोणी नाही--- **सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार हे वरील दिलेल्या पत्त्यावरील कायम रहिवाशी आहे. अर्जदार यांचे जनक वडील एकनाथ भिकाजी कडु हे दि. १५/०३/२०२० व आई निर्मला एकनाथ कडु या दि. २६/०४/२०१० रोजी मयत झालेले आहेत. मयतांना अर्जदार हेच दोन मुले वारस आहे. मयत एकनाथ भिकाजी कडु यांचे नावे असलेले आयडीबीआय बँक श्रीरामपुर शाखेमधील बचत खाते नं ५२३१००१०००५२२४ मधील रक्कम रु ३४१५८.०० साठी तसेच इतर सरकारी कामे व इतर वित्तीय कामी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदर नोटीस देत आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांचे वडील एकनाथ भिकाजी कडु हे दि. १५/०३/२०२० व आई निर्मला एकनाथ कडु या दि. २६/०४/२०१० रोजी मयत झाल्या असून त्यांना अर्जदार हेच वारस असलेबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनो न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग राहाता यांचे समक्ष दि. २३/१०/२०२६, रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे अन्यथा पुडोल हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/९/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले असे.

**तयार करणार** **वरिष्ठ लिपीक** | शिक्का | **हुकूमावरुन** **सहा अधिक्षक** **दिवाणी न्यायालय, क स्तर, राहाता**

---

**जाहिर नोटीस**

निशाणी क्र.
दिनांक : २१/९/२०२६
नेमलेली तारीख ०९/१०/२०२६

**ॲड. एस. एस. कोतकर**
**नेवासा कोर्ट**

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब सि.डी. यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ११४/२०२६

**अर्जदार-**१). भाऊसाहेब नामदेव मोरे, वय ५२, धंदा शेती रा. टाकळीमिया, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर

२) शोभा सुखदेव उदागे, वय ५५, धंदा शेती रा. टाकळीमिया, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर

**सा.वाला-**१) मिना रावसाहेब मोरे, वय ५०, धंदा शेती

२) शिवशंकर रावसाहेब मोरे, वय २५, धंदा शेती दोघे रा. टाकळीमिया, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर

मयत-चंद्रकला भिमराज पडोळ, मयत दि. ०४/०१/२०१२

अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारस सर्टिफिकेट मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांचे भाचा व भाची आहे. सा. वाले नं. १ व २ हे मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांचा मयत भाचा रावसाहेब मोरे यांचे वारस आहे. चंद्रकला भिमराज पडोळ ही दि. ०४/०१/२०१२ रोजी निपाणी निमगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे मयत झालेले आहे, त्यांना अर्जदार व सा. वाला हेच वारस आहेत. मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांना कुणीही मुलबाळ नव्हते व नाही. त्यांना अर्जदार व सा. वाला यांच्या व्यतिरिक्त इतर कुणीही वारस नाही. मौजे पाचेगाव, ता. नेवासा येथील गट नंबर १८२/६ क्षेत्र १ हे २५ आर या मिळकतीचे मुळ मालक नाणीबाई यशवंत पडोळ हया होत्या. त्या दि.१९/०२/१९९६ रोजी मयत झालेल्या आहे. त्यांना वारस भिमराज यशवंत पडोळ मुलगा व दोन मुली सुशिला यशवंत पडोळ, वत्सला नामदेव मोरे या होत्या. त्यांचा सुन चंद्रकला भिमराज पडोळ व भिमराज पडोळ यांना कोणतेही अपत्य नव्हते. भिमराज हा दि.१९/०२/२०१४ रोजी मयत झालेला आहे. तसेच चंद्रकला ही दि.०४/०१/२०१२ रोजी मयत झालेली आहे. तसेच सुशिला यशवंत पडोळ हिचे लग्न झालेले नव्हते, ती दि. २९/११/२०२५ रोजी मयत झालेली आहे. तसेच अर्जदार यांची आई वत्सला नामदेव मोरे ही दि. १४/०४/२०२५ रोजी मयत झालेली आहे. मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांना कोणतेही मुळ बाळ नव्हते त्यांचा संभाळ पालन पोषण, औषध उपचार, अंत्य विधी व इतर धार्मिक विधी हे संपुर्ण अर्जदार व सा. वाले यांनी केलेले आहे. मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांना कायदेशिर वारस अर्जदार व सा. वाले हेच आहेत. या व्यतिरिक्त मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांना कोणीही वारस नव्हते व नाही. मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांना मौजे पाचेगाव, ता. नेवासा येथील गट नंबर १८२/६ यापैकी ० हे ६३ आर ही मिळकत होती व आहे. सदर अर्जदार यांची मामी चंद्रकला भिमराज पडोळ हे मयत झाल्यानंतर अर्जदार यांनी कामगार तलाठी मौजे पाचेगाव, ता. नेवासा यांचेकडे अर्जदार व सा.वाले कायदयाप्रमाणे वारस असल्याने त्यांची नोंद लावण्यांसाठी कागदपत्रासह अर्ज अर्जदार व सा.वाले यांच्या नावाची नोंद मौजे पाचेगाव, ता. नेवासा येथील गट नंबर १८२/६ यापैकी क्षेत्र ० हे ६३ आर मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांचे वारस म्हणुन लावण्यासाठी अर्ज दिलेला होता. परंतु का. तलाठी पाचेगाव यांनी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणल्याशिवाय नोंद लावता येणार नाही व नोंद करण्यास नकार दिला. म्हणुन अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

तरी मयत चंद्रकला भिमराज पडोळ यांना अर्जदार व सा. वाले हेच एकमेव वारस नाहीत असे कोणाचे म्हणणे असेल तर त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द दि. ०९/१०/२०२६ या नेमलेल्या तारखेच्या दिवशी ३० दिवसाचे आत स्वतः अगर वकिलामार्फत सर्व कागदपत्रानिशी या न्यायालयात उपस्थित रहावे. उपस्थितीत राहण्यास कसुर केल्यास न्यायालय पुरावा घेऊन योग्य ते आदेश पारीत करेल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्याशिक्यानिशी दिले असे.

**कामगिरी लिपिक** **दिवाणी न्यायालय, व. स्तर, नेवासा** | शिक्का | **हुकूमावरुन** **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय, व स्तर, नेवासा**

पान १ वरुन

## दुष्काळाच्या पाहणीसाठी सरकार बांधावर

तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना नुकसानभरपाईबाबत महत्त्वाची घोषणा केली. पुढील दोन दिवसांत दुष्काळाबाबत शासन निर्णय काढून शेतकऱ्यांना सरसकट मदत जाहीर केली जाईल, असे त्यांनी सांगितले. प्राथमिक अहवालांच्या आधारे दुष्काळाची पहिली अधिसूचना शनिवारपूर्वी काढण्याचे संकेतही त्यांनी यापूर्वी दिले होते.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विदर्भातील अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यांतील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. शिंदे यांनी आपल्या पक्षातील मंत्र्यांनाही आपापल्या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे व पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

एकीकडे करपलेली खरीप पिके, दुसरीकडे घटलेला धरणसाठा आणि तिसरीकडे पिण्याच्या पाण्याचे संकट, अशा तिहेरी कोंडीत राज्यातील ग्रामीण भाग सापडला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या पाहणी दौऱ्यानंतर आता प्रत्यक्ष मदत कधी आणि किती मिळणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## ऊसाच्या प्रत्येक काट्यावर आता सरकारची नजर!

२०२६-२७ गाळप हंगामासाठी २२ कारखान्यांनी परवान्यासाठी ऑनलाइन अर्ज केले आहेत. त्यामुळे यंदाच्या हंगामात डिजिटल वजन प्रणालीची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, याकडे जिल्ह्यातील ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

महत्त्वाचे म्हणजे हा केवळ वजनकाट्याचा प्रश्न नाही. ऊसाचे वजन म्हणजे शेतकऱ्याच्या वर्षभराच्या श्रमाचे आर्थिक मूल्य. त्यामुळे काट्यावरचा प्रत्येक किलो शेतकऱ्याच्या खात्याशी जोडलेला आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केवळ कागदावर न राहता प्रत्येक कारखान्यात प्रत्यक्ष, नियमित आणि पारदर्शक झाली तर ऊस उत्पादकांचा कारखान्यांवरील विश्वास अधिक मजबूत होऊ शकतो.

काट्यावरचा प्रत्येक किलो आता केवळ आकडा न राहता शेतकऱ्याच्या हक्काचा लेखाजोखा ठरण्याची गरज आहे. शासनाच्या निर्णयाची खरी कसोटी मात्र त्याची कारखाना पातळीवरील अंमलबजावणी आणि शेतकऱ्याला मिळणारी प्रत्यक्ष पारदर्शकता हीच राहणार आहे.

## पीक पाहणीपेक्षा दुष्काळ जाहीर करण्यासाठी पुढाकार घ्या : अंबादास दानवे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, सत्तेत असणाऱ्यांनी केवळ पीक पाहणीचे दौरे न करता दुष्काळ जाहीर करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. त्यांनी मंगळवारी (दि.



२२) वैजापूर तालुक्यातील खंडाळा शिवारात मका पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती घेतली. खंडाळा परिसरात मोठ्या प्रमाणात मका व कपाशीची लागवड करण्यात आली आहे. मात्र पावसाने दडी मारल्याने पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही. परिणामी मका पीक करपून गेले असून, अनेक ठिकाणी कणसात दाणे भरण्यापूर्वीच पीक वाळले आहे. काही ठिकाणी अर्धवट कणसांना अळी लागल्याचेही दानवे यांनी सांगितले. पीक काढणीपर्यंत नेणे तर दूरच, काढणीचा खर्चही परवडत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी नमूद केले. सत्तेत असणाऱ्यांचे काम पीक पाहणी करण्यापेक्षा शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देणे आणि दुष्काळ जाहीर करणे हे आहे, असे दानवे म्हणाले. मागील वर्षी जाहीर केलेली नुकसानभरपाई अद्याप मिळाली नसल्याचा आरोपही त्यांनी केला. उपग्रहाच्या पाहणीत पिके हिरवी दिसत असली तरी प्रत्यक्ष शेतात शंभर टक्के नुकसान झाल्याचे त्यांनी कृषी विभागाच्या निदर्शनास आणून दिले.यावेळी संजय पाटील निकम, रमेश सावंत, हुसेन शेख, विठ्ठल डमाळे, गोरखनाथ शिंदे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाला अचूक माहिती सादर करा आ. आशुतोष काळे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यात २६ जुलैपासून पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर झाल्यानंतर करावयाच्या उपाययोजनांसाठी प्रशासनाने अचूक माहिती शासनाला सादर करावी, अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी दिल्या. मंगळवारी (दि. २२) कोपरगाव तहसील कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ आढावा बैठक झाली.

बैठकीत तालुक्यातील पर्जन्यमान, पिकांची स्थिती, उपलब्ध पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची गरज, जनावरांचा चारा तसेच आगामी पाणीटंचाईचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दुष्काळ जाहीर करण्यासाठी शासनाच्या निकषांनुसार मंडलनिहाय पावसाची आकडेवारी निश्चित करावी, पिकांचे नुकसान झाल्यास त्याची नोंद घेऊन शासकीय मदतीसाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या.धरणातील उपलब्ध पाणीसाठा व आगामी आवर्तनांचे नियोजन करून शेती आणि पिण्याच्या पाण्याची गरज भागवावी, असे काळे यांनी सांगितले. कोपरगाव शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उपलब्ध साठ्याचाही आढावा घेण्यात आला.तालुक्यातील गावठाण व शेतीचे वीजरोहित्र स्वतंत्र करून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याच्या सूचना महावितरणला देण्यात आल्या. तालुक्यात सात ठिकाणी सौरऊर्जा प्रकल्प देण्यात आल्याची माहितीही देण्यात आली.बैठकीस आमदार विवेक कोल्हे, प्रांताधिकारी धनंजय बांगर, तहसीलदार महेश सावंत, मुख्याधिकारी अजित निकत, गटविकास अधिकारी स्वप्नील वाळुंज यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# शिंदेवाडी फाट्यावर ६८ हजारांच्या लुटीचा बनाव

## फायनान्स कर्मचाऱ्याने दोन साथीदारांसह रचला कट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** फायनान्स कंपनीच्या ग्राहकांकडून वसूल केलेली ६८ हजार ५६ रुपयांची रोकड हडप करण्यासाठी स्वतःच्या लुटीचा बनाव केल्याचा प्रकार शिंदेवाडी फाट्याजवळ उघडकीस आला. या प्रकरणी गंगापूर पोलिसांनी फायनान्स कंपनीचा फिल्ड असिस्टंट किरण पंढरीनाथ वैरागर याच्यासह रवि ज्ञानदेव दरंदले व आकाश साहेबराव हटकर या तिघांना अटक केली आहे.

भारत फायनान्शियल इनक्लूजन लिमिटेडच्या गंगापूर शाखेत कार्यरत असलेला किरण वैरागर २१ सप्टेंबर रोजी लासूर परिसरात हप्ते वसुलीसाठी गेला होता. दिवसभरात त्याने ६८ हजार ५६ रुपये वसूल केले. सायंकाळी शाखा व्यवस्थापक योगेश गिते यांनी त्याच्याशी संपर्क साधला असता, काही वेळात कार्यालयात येत असल्याचे त्याने सांगितले. मात्र तो कार्यालयात न परतल्याने त्याचा शोध सुरू करण्यात आला.

रात्री दहाच्या सुमारास लासूर-गंगापूर रस्त्यालगत किरण हात-पाय बांधलेल्या अवस्थेत आढळला. त्याने चार अनोळखी व्यक्तींनी चाकूने जखमी करून रोकड व मोबाईल लुटल्याचे सांगितले. मात्र त्याच्या कथनातील विसंगतीमुळे पोलिसांनी सखोल चौकशी केली. त्यात किरणने रवि व आकाश यांच्या मदतीने लुटीचा



बनाव केल्याचे तपासात समोर आले.

कथित कटानुसार शिंदेवाडी फाट्याजवळ किरणचे हात-पाय बांधून त्याच्या बॅगेतील रोकड व मोबाईल घेऊन साथीदार निघून गेल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोहेकॉ विजय पाखरे करीत आहेत.

# गणरायाच्या आरतीला पीआय देशमुख

## 'होम मिनिस्टर'मध्ये महिलांचा जल्लोष!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** सर्वधर्म समभाव, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचा जागर करीत सोनगाव येथील सर्वधर्म समभाव गणेश मंडळाचा गणेशोत्सव उत्साहात सुरू आहे. गणेश स्थापनेपासूनच विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवाला रंगत आली असून, गणरायाच्या आरतीपासून महिलांच्या 'होम मिनिस्टर'पर्यंत सोनगावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमास राहुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. पीआय रवींद्र देशमुख तसेच सोनगावच्या पोलिस पाटील अनिताताई संतोष अंत्रे यांच्या हस्ते श्री गणरायाचे पूजन व आरती करण्यात आली. मंडळाने निमंत्रित केल्याबद्दल देशमुख यांनी आभार व्यक्त केले. यावेळी डी. जे.मुक्त, शांततामय आणि सामाजिक सलोखा जपणारा गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन त्यांनी केले. 'होम मिनिस्टर'मध्ये महिलांचा उत्साह गणेशोत्सवातील विशेष आकर्षण ठरलेल्या भव्य 'होम मिनिस्टर' कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संगमनेर येथील प्रसिद्ध निवेदिका व गायिका माधुरी चंद्रकांत



गुंजाळ यांच्या प्रभावी निवेदनाने कार्यक्रमात रंगत भरली. विविध खेळ, मनोरंजनाचे उपक्रम आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे गणेशोत्सवी संध्याकाळ जल्लोषमय झाली. महिलांच्या उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी यश ज्वेलर्सचे श्याम डहाळे यांच्या सौजन्याने आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली होती. प्रथम क्रमांकासाठी येवला पैठणी, द्वितीय क्रमांकासाठी सोन्याची नथ, तर अन्य आठ विजेत्यांसाठीही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली. सोनाली गणेश सोनावणे यांनी येवला पैठणी, तर अंकिता रोहित धनवट यांनी सोन्याची नथ पटकावली. संगीता विठ्ठल धनवट, लक्ष्मीबाई बबन प्रधान, सुरेखा रोहिदास घोडके, प्रज्ञा राहुल थोरात, रुपाली सूर्यभान पगारे, ज्योती प्रशांत शिंदे, भारती किरण अंत्रे आणि पूजा संतोष प्रधान यांनी अन्य बक्षिसे मिळविली. कार्यक्रमास राहुरी पोलिस ठाण्याचे सोनगाव बिट पो.ह. सूरज गायकवाड, पो.कॉ. शकूर सय्यद, पो.ह. देविदास कोकाटे, पो.कॉ. प्रमोद ढाकणे आणि पो.कॉ. रवी पवार उपस्थित होते. गणेश मंडळाचे अध्यक्ष भगवान धनवट, उपाध्यक्ष अजित डहाळे, सचिव प्रवीण प्रधान यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. गणेशोत्सवातील विविध उपक्रमांना ग्रामस्थ, महिला आणि भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## ना. विखे यांच्या सूचनेमुळे शेतकरी वर्गाला दिलासा : डॉ धनवटे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** गोदावरी नदीपात्रात परिसरातील नाऊर कमाल पूर खानापूर वांजरगाव सह अनेक कोल्हापूर पद्धतीचे बंधारे कोरडे आहेत. हे बंधारे भरून घेण्यासाठी गोदावरी नदीपात्रात तातडीने पाणी सोडण्याची सूचना जलसंपदा मंत्री ना. विखे यांनी जलसंपदा विभागाला दिल्यामुळे पुणतांबा परिसरातील शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे. असे प्रतिपादन पुणतांबा गावचे माजी सरपंच डॉ धनजंय धनवटे यांनी दिली आहे. परिसरातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न व नदीपात्रात कोरडे असलेले बंधारे याबाबद कैफियत मांडण्यासाठी परिसरातील शिष्टमंडळाने जनता दरबारात ना विखे भेट घेऊन निवेदन दिले शिष्टमंडळात डॉ धनवटे सह कैलास बोर्डे सतीश बोर्डे सुनिल लांडे विजय कुंजीर नारायण कणसे अशोक गायकवाड अमोल सराळकर सह अनेकांचा सहभाग होता. परिसरात चालू वर्षी अपुऱ्या पावसामुळे पाणी गंभीर पाणी प्रश्न निर्माण झालेला आहे विहिरींच्या पाण्याने तळ गाठला आहे चाऱ्याची टंचाई निर्माण झाली असून खरीप हंगामच पूर्ण पणे वाया जाण्याची भिती निर्माण झाली निदान गोदावरी नदी पात्रात पाणी सोडले तर निदान काही अंशी पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल म्हणून नदीपात्रात पाणी सोडून बंधारे भरून द्यावेत अशी विनंती शिष्टमंडळाने ना विखे यांच्याकडे केली त्याची दखल ना. विखे यांनी घेऊन जलसंपदा विभागाला पाणी सोडण्याची सूचना केली सध्या गोदावरी नदीत ३५०० क्यूसेस पाणी सोडले असून पाऊस झाल्यामुळे पाण्याचा विसर्ग ४००० क्यूसेस वाढविण्यात आला आहे त्यामुळे गोदावरी नदीपात्रातील पुणतांबा नाऊर नायगाव कमालपूर वांजरगाव सह सर्व बंधारे भरण्याची आशा शेतकरी वर्गात निर्माण झाली असून दुष्काळ सदृश परिस्थितीत शतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे असेही डॉ धनवटे यांनी आर्वजून स्पष्ट केले आहे.

# शिपी आमटी, भाकरी ठेचा

## 'वरद'च्या 'खाऊ गल्ली'त तीन पिढ्यांचा जल्लोष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** गणेशोत्सव म्हटला की भक्ती, उत्साह आणि आनंदाचा माहोल... त्यात अस्सल गावरान पदार्थांची चव, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि तीन पिढ्यांचा सहभाग मिळाला की हा न आनंदोत्सव आणखी रंगतो. वरद गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'खाऊ गल्ली' यंदा अशीच सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. अवघ्या दोन न वर्षांच्या चिमुकल्या श्लोकापासून ७५ वर्षांच्या परदेशी मावशींपर्यंत नागरिकांनी सहभाग घेतल्याने खाऊ गल्लीला अक्षरशः आनंदमेळ्याचे स्वरूप आले.महिला व बालकल्याण सभापती पुष्पा बोरुडे यांच्या हस्ते खाऊ गल्लीचे उद्घाटन झाले. उद्घाटनानंतर नागरिकांनी विविध खाद्यपदार्थांवर ताव मारत उपक्रमाला प्रतिसाद दिला. खाऊ गल्लीत बटाटेवडा, पाणीपुरी, हुलगे शेंगोळे आमटी, ढोकळा, पुलाव, फ्रूट सलाड यांसह कर्जतची शिपी आमटी, बाजरीची भाकरी आणि ठेचा अशा अस्सल गावरान पदार्थांची रेलचेल होती. घरगुती पद्धतीने तयार केलेल्या या पदार्थांनी नगरकरांना पारंपरिक चवीची मेजवानी दिली. वरद कॉलनीसह परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केल्याने खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर दिवसभर लगबग पाहायला मिळाली.



अवघ्या दोन वर्षांची श्लोका असो किंवा ७५ वर्षांच्या परदेशी मावशी... सर्व क्योगटातील नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. या वेळी डॉ. दीपक करपे, जगदीश गुंगे, नंदकिशोर घोडके, साईगीता सब्बन, प्रवीण परदेशी, नायब तहसीलदार राजेंद्र लाड, गणेश म्हस्के, येवलेकर यांच्यासह वरद कॉलनीतील सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. या खाऊ गल्लीचे विशेष आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांचा सहभाग. विद्यार्थ्यांनी स्वतः खाद्यपदार्थ तयार करून त्यांची विक्री तर केलीच; पण त्यासोबत जाहिरात, ग्राहकांशी संवाद, ऑर्डर घेणे आणि आर्थिक व्यवहाराची जबाबदारीही उत्साहाने सांभाळली. त्यामुळे पुस्तकातील शिक्षणासोबत प्रत्यक्ष व्यवहारातून नियोजन, संघभावना, संवादकौशल्य, आर्थिक व्यवस्थापन आणि उद्योजकतेचे धडे विद्यार्थ्यांनी घेतले आहे.

# राहाता नगरपरिषदेच्या सेवेत ५ नव्या घंटा गाड्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहाता. :** शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी नगर पालीका प्रशासनाच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून, काल पाच नवीन कोऱ्या घंटा गाड्या राहता नगरपरिषदेच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. यामुळे आता नागरिकांच्या थेट दारापर्यंत जाऊन घरोघरी कचरा संकलन करणे अधिक सोपे आणि प्रभावी होणार आहे .

यावेळी नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर म्हणाले की, सत्तेत आल्यानंतर राहता शहरातील कचरा व्यवस्थापनाची पाहणी केली असता, शहरात घंटा गाड्यांची मोठी कमतरता असल्याचे आमच्या निदर्शनास आले होते. अपुऱ्या गाड्यांमुळे कचरा वेळेवर उचलला जात नव्हता, परिणामी अनेक राहाता नगर वासिया कडून रस्त्याच्या कडेला किंवा अडगळीत कचरा टाकला जात होता. ही गंभीर समस्या लक्षात घेता, आम्ही तातडीने पावले उचलली आणि येथे कार्यरत असणारे स्वच्छता ठेकेदार 'उत्तराधी अमरावती' यांच्याकडे अतिरिक्त गाड्या उपलब्ध करण्याची आग्रही मागणी केली होती. आमच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ठेकेदाराने काल पाच नवीन कोऱ्या घंटा गाड्या प्रशासनाकडे सुपूर्द केल्या.आमचे नेते , पालकमंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतील 'सुंदर शहर, स्वच्छ शहर राहता' बनवण्याच्या दिशेने या घंटागाड्यांमुळे आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. नगरपरिषदेत दाखल झालेल्या या नवीन घंटागाड्यांचे विधिवत पूजन नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## कांदा मार्केटबाबत पत्रकार परिषद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील शिऊर परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जवळची व हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिऊर बंगला येथे किसान विकास जिनिंग प्रेसिंग संस्थेच्या सहा एकर जागेत उपबाजार शिऊर अंतर्गत मोकळ्या कांद्यासाठी मार्केट सुरु करण्यात येणार असून त्याचे उदघाटन आज, गुरुवारी (२४ सप्टेंबर) सकाळी दहा वाजता राज्याचे इतर मागास कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आमदार रमेश बोरनारे,जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, नगराध्यक्ष डॉ दिनेश परदेशी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कल्याण दांगोडे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माजी संचालक मधुकर पवार, सचिव प्रल्हाद मोटे, आर. बी. निकम हे उपस्थित होते.

ते म्हणाले, कांदा मार्केटसाठी सहा एकर जागा भाडेपट्ट्यावर घेण्यात आली असून त्याठिकाणी प्रथम पाच व्यापाऱ्यांसाठी आठ लाख रुपये किंमतीचे पाच व्यापारी गाळे जिल्हा उप निबंधक यांच्या परवानगीने बांधण्यात आले आहेत. यापुढील काळात कांदा मार्केटच्या उर्वरित जागेत टोमॅटो व मिरची साठीही बाजारपेठ सुरु करण्याचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कांदा व्यापारासाठी शिऊर परिसरातील व वैजापूर कांदा मार्केट येथील २५ व्यापाऱ्यांच्या माध्यमातून कांदा खरेदी विक्री करण्यात येणार आहे. त्यामुळे शिऊर परिसरातील पन्नास गावांना जवळची बाजारपेठ उपलब्ध होऊन त्यांचा वाहतूक खर्च कमी होऊन वेळ वाचणार आहे असे दांगोडे म्हणाले.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

**गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

९ — १८० २३४ २२५
४ — १४९ २४८ २००
१ — १२८ २९० १५५

९३-०९-४२-५४-१७-२१

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

३ — १२० २३८ ३५५
८ — १८९ २६० २३३
२ — १२९ ३४६ २५५

३७-१३-८९-५८-२०-६२

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

५ — १४० २५८ ३६६
६ — १२३ २४० ४६६
० — १४५ २३५ २९९

५४-१५-६२-३६-०९-२०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## निधन

### सुभाष वैष्णव



**कोल्हार :** येथील शिवाजीनगर मधील रहिवासी सुभाष बंडुदास वैष्णव (वय ६०) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, एक विवाहित मुलगी, भाऊ, भावजय, नातू जावई असा मोठा परिवार आहे. ते निलेश व उमेश वैष्णव यांचे वडील होत तर डॉ. संजय वैष्णव यांचे बंधू होत.

### सुमनबाई पुजारी



**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर खुर्द येथील सुमनबाई गंगाधर पुजारी (वय- ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, भाऊ, नातू, नात, भाचे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. मुळा प्रवराचे सेवानिवृत्त कर्मचारी नवनाथ सखाराम जेजुरकर यांच्या भगिनी व वांबोरी येथील केएसबी कंपनीचे कर्मचारी सुधाकर पुजारी व मधुकर पुजारी यांच्या मातोश्री तर स्वप्नील व नकुल जेजूरकर यांच्या त्या आत्या होत. सुमनबाई पुजारी यांनी मरणोत्तर नेत्रदान केले आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE OLD NAME IN MY HINA KAUSAR ALTAF SHAIKH (BEFORE NAME) TO NEW NAME AS HINA ALTAF SHAIKH (AADHAR NO. 5787 6840 3378) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE- SHRIRAMPUR DATE- 23/09/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE OLD NAME IN MY KAMA ISMAIL SAYYAD (BEFORE NAME) TO NEW NAME AS KAMRUNISA ISMAIL SHAHA (AADHAR NO. 8352 0725 2091) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE- KOPARGAON DATE- 23/09/2026

**Change of name**

My previous name was Satish Kachru Lute,now my new name is Satish Kacheshwar Lute. AFFN 2652242041268100718958 Date 16/ 09 /2026

**Change of name**

My previous name was Kachru Kondaji Lute,now my new name is Kacheshwar Kondaji Lute. AFF No 2652242041268100720929 Date 23/09/2026

**Change of name**

My previous name was Hirabai Kachru Lute,now my new name is Hirabai Kacheshwar Lute. AFF No 2652242041268100720928 Date 23/09/2026

**नावात बदल**

माझे नाव कागदपत्रांमध्ये Rajat Pawankumar Agrawal असे आहे, तर काही कागदपत्रांमध्ये Rajat Pawan Agrawal असे नमूद आहे. वरील दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून, Rajat Pawankumar Agrawal आणि Rajat Pawan Agrawal ही दोन्ही नावे माझीच आहेत.

**छोटी जाहिरात**

श्रीरामपूर शहरालगत MIDC पासून जवळच धनगरवाडी शिवारात ११ गुंठे शेतजमीन विकणे आहे.

संपर्क : रमेश सातव ८१०४९६२३८९

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

द•ख•ल



## चेन्नईत महाराष्ट्रीयन कुटुंबियांचा गणेशोत्सव

**भाळवणी :** महाराष्ट्रातील तसेच विविध राज्यांतील नोकरीनिमित्त चेन्नई येथे एका सोसायटीमध्ये रहात असलेल्या नागरिकांनी एकत्र येत सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. या सोसायटी मध्ये रहात असलेल्या पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथील संदीप पानमंद या एकमेव महाराष्ट्रीयन कुटुंबाने विविध राज्यांतील कुटुंबियांसमवेत सर्व पुरुष, महिला, तसेच बालगोपाळांनी मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम आयोजित करुन आपली महाराष्ट्रीयन परंपरा जपण्याचे काम केले आहे. पारंपारिक कार्यक्रमांचे आयोजन करत बालगोपाळांनी या सार्वजनिक गणेशोत्सवाचा आनंद लुटला. मोठ्या श्रद्धेने वर्षभरातील सर्व सन, उत्सव आपले महाराष्ट्रीयन बांधव साजरे करत आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतात. सोसायटीमधील सुजाता संदीप पानमंद , गितीका जोशी, ममता जांगडा, पूजा देवरानी, भावना, दिपीका भराणी, शिरिषा रेड्डी, निशा सिंह या सर्व कुटुंबियांनी एकत्र येऊन सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला. या सर्व कार्यक्रमांमध्ये स्थानिक नागरिकांचाही सहभाग असतो.

## जिल्हा सहकारी बँकेच्या उमेदवारीसाठी गीतांजली शेळके यांना पाठिंबा

**निघोज :** जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत लढणार असल्याची घोषना जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका तथा जी एस महानगर बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांनी नुकतीच केली असून सोसायटी मतदारसंघातील बहुसंख्य मतदारांनी आपण गीतांजली



शेळके यांनाच पाठिंबा देणार असून श्रीमती शेळके याच जिल्हा सहकारी बँकेच्या पारनेर सोसायटी मतदासंघात निवडून येणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. श्रीमती शेळके या गेली तीन वर्षांपासून जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका म्हणून कार्यरत आहेत. जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन ड. उदय दादा शेळके यांच्या निधनाने रिक्त झालेल्या संचालक पदावर त्यांची बिनविरोध निवड झाली होती. गेली तीन वर्षांच्या कार्यकाळात श्रीमती शेळके यांनी तालुक्यातील बहुसंख्य सोसायट्यांना सदिच्छा भेट देत शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यावर मार्ग काढीत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सोसायटी मतदारसंघातील ठराव करताना सतर्क राहून ताईंनी आपल्या कार्यकर्त्यांचे ठराव जास्तीत जास्त कसे होतील यासाठी प्रयत्न केले असल्याने ताईंच्या बाजूच्या ठरावांची संख्या जास्त असल्याचे त्यांच्या समर्थकांनी माहिती देताना सांगितले आहे. गेली दोन दिवसांपूर्वी श्रीमती शेळके या निघोज जिल्हा परिषद गट, कान्हूरपठार जिल्हा परिषद गट तसेच टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील सोसायटी मतदारसंघातील मतदारांना भेटून सोसायटीचे मतदार संघातून लढण्यासाठी तीसरा संपर्क दौरा पुर्ण केला असून ताईंना भरघोस प्रतिसाद मिळाला आहे.

## भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक पोलीस प्रशासन सज्ज

**अहिल्यानगर :** नगर शहराच्या उपनगर भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणूक आज २३ सप्टेंबर रोजी निघणार आहे. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून मिरवणूक मार्गावर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या मिरवणुकीत डीजेच्या दणदणाटाल बंदी घालण्यात आली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्वी थोरात यांनी दिली. भिंगार शहरांमध्ये दरवर्षीप्रमाणे वामन जयंतीच्या दिवशी गणेश विसर्जन केले जाते. दरवर्षी साधारणपणे आठव्या दिवशी ही विसर्जन मिरवणूक काढली जाते. मात्र यावर्षी एक तीथी वाढल्याने गणेशोत्सव बारा दिवस असल्याने नवव्या दिवशी २३ सप्टेंबर रोजी ही मिरवणूक काढण्यात येणार आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत भिंगार शहर व नगर तालुक्यातील ११ गावे यामध्ये सुमारे ९६ सार्वजनिक गणेश मंडळाने गणेशाची प्रतिष्ठापना केलेली आहे. भिंगार मधील गणेश विसर्जन मिरवणूक पारंपारिक १२ मंडळाचा सहभाग असणार आहे. मानाच्या देशमुख गणपतीची उथान पूजा पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या हस्ते होऊन दुपारी पारंपारिक वाद्यात मिरवणूक निघेल. त्यानंतर सायंकाळी विविध गणेश मंडळ यांकडून मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या परिसरातील एकूण बारा सार्वजनिक गणेश मंडळ यांच्य मिरवणुकीत सहभाग असेल. या मिरवणुकीसाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. विविध पोलीस अधिकारी तसेच होमगार्ड, राज्य राखीव दलाचे पथक मिरवणूक मार्गावर बंदोबस्तासाठी आहे. या मिरवणुकीत डीजेच्या दणदणाला बंदी घालण्यात आली आहे. केवळ दोन बेस आणि दोन टॉप लावता येणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तसेच मिरवणुकी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे कृत्य करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

## सावेडीत संस्कृत दिन उत्साहात साजरा



**अहिल्यानगर :** श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर अंतर्गत असलेल्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी संस्कृत दिन आनंदी व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सरस्वती प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते संस्कृत वस्तू प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले. विद्यार्थिनीने गणेशवंदना गीतावर शास्त्रीय नृत्य सादर केले. इतर विद्यार्थिनींनी संस्कृत बोधकथेचे कथाकथन केले. विद्यार्थ्यांनी 'सरमाया: शीलम्' या संस्कृत पोवाड्याचे सादरीकरण केले. तसेच संस्कृत नाटिका, संस्कृत स्तोत्रावर आधारित योगासने, संस्कृत गीतांवर भरतनाट्यम नृत्य, संस्कृत भाषेतून संस्कृत महिमा आणि संस्कृत हास्यकणिकांचे सादरीकरण करण्यात आले. काही विद्यार्थिनींनी संस्कृत भाषेचा व भारताचा गुणगौरव मांडला. प्रमुख अतिथी रेणुका मुळे यांनी आपल्या ओघवत्या भाषाशैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी संस्कृत भाषेचे प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेतील महत्त्व विशद केले. तसेच आधुनिक काळातील तिची उपयुक्तता व भविष्यातील संभाव्यता यावर सविस्तर विवेचन केले. योग, आयुर्वेद, भारतीय तत्त्वज्ञान, संगीत, स्थापत्यशास्त्र, संगणकीय भाषा अशा विविध ज्ञानशाखांशी संस्कृतचा असलेला संबंध त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. संस्कृत ही केवळ भूतकाळापुरती मर्यादित असलेली भाषा नसून भविष्यातील ज्ञाननिर्मितीची समर्थ आणि सक्षम भाषा होऊ शकते, हा विचार त्यांनी प्रभावीपणे मांडला.

# गणेशोत्सवात रहदारी नियोजनाचा अभाव

### जड वाहतुकीमुळे कोंडीत भर; गणेशभक्तांमध्ये नाराजी; प्रमुख मार्गांवर वाहतूक सुरळीत करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध गणेश मंडळांचे आकर्षक देखावे नागरिकांसाठी खुले झाले आहेत. हे देखावे पाहण्यासाठी दररोज सायंकाळी शहरातील विविध भागांत गणेशभक्त व नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, वाढत्या गर्दीच्या तुलनेत शहरातील वाहतूक व्यवस्थेचे पुरेसे नियोजन नसल्याने अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे गणेशभक्तांसह वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. कुटुंबांसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलेही मोठ्या संख्येने देखावे पाहण्यासाठी बाहेर पडत आहेत. अनेक ठिकाणी नागरिकांकडून वाहने रस्त्याच्या कडेला किंवा उपलब्ध जागेत उभी केली जात असल्याने रस्त्याची वाहतूक क्षमता कमी होत आहे. त्यातच प्रमुख मार्गांवर एकाच वेळी मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ वाढत असल्याने वाहतूक संथ होऊन कोंडी निर्माण होत आहे.

शहरातील काही भागांमध्ये सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत अवजड वाहनेही प्रवेश करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



एका बाजूला गणेशभक्तांची मोठी गर्दी आणि दुसरीकडे अवजड वाहनांची सुरू असलेली वाहतूक यामुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडी अधिक तीव्र होत आहे. परिणामी, कमी अंतर पार करण्यासाठीही वाहनचालकांना अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागत असून, नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील प्रमुख गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी वाहतूक वळविणे, पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, वाहनतळांची व्यवस्था करणे, प्रभावी रहदारी नियमन करणे तसेच प्रमुख चौकांवर अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सायंकाळी गर्दी वाढण्यास सुरुवात झाल्यानंतर वाहतूक कोंडी निर्माण झाल्यावर उपाययोजना करण्याऐवजी गर्दीच्या वेळेपूर्वीच वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे. प्रमुख चौक, गणेश मंडळांचे देखावे असलेले मार्ग तसेच गर्दीची शक्यता असलेल्या ठिकाणी वाहतूक पोलिसांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून वाहतूक सुरळीत ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

गणेशोत्सव हा शहरातील नागरिकांसाठी उत्साहाचा आणि धार्मिक श्रद्धेचा सण आहे. त्यामुळे गणेशभक्तांना कोणताही त्रास न होता सुरक्षितपणे देखावे पाहता यावेत, यासाठी पोलीस प्रशासन आणि शहर वाहतूक नियंत्रण शाखेने समन्वयाने प्रभावी वाहतूक आराखडा राबविण्याची गरज आहे.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही स्वयंसेवकांच्या माध्यमातून वाहनांच्या शिस्तबद्ध पार्किंगची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांनीही शक्यतो रस्त्यावर वाहने उभी करू नयेत तसेच गर्दीच्या मार्गांवर जाण्याऐवजी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## चिचोंडी पाटीलसाठी १० लाखांचा निधी मंजूर

### आ. पाचपुते यांच्या माध्यमातून रस्त्याचा प्रश्न मार्गी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**चिचोंडी पाटील :** श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार विक्रम पाचपुते यांच्या माध्यमातून चिचोंडी पाटील येथील सद्गुरू संत श्री गणेशनाथ बाबा चौक ते स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १० लाख रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून खराब अवस्थेत असलेल्या या महत्त्वाच्या रस्त्याचा प्रश्न आता मार्गी लागणार असून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तथा चिचोंडी पाटील गावचे माजी सरपंच मनोज कोकाटे यांनी दिली.



> सद्गुरू संत श्री गणेशनाथ बाबा चौक ते स्मशानभूमी हा चिचोंडी पाटील गावासाठी अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. बाजार, लक्ष्मीआई मंदिर तसेच स्मशानभूमीकडे जाण्यासाठी या रस्त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल आमदार विक्रम पाचपुते यांचे ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक आभार.
>
> **मनोज कोकाटे**

सदर निधी मंजूर झाल्यानंतर गावातील भाजप पदाधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत सदर रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी व मोजमाप केले. त्यामुळे रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाच्या प्रक्रियेलाही गती मिळाली आहे.

सद्गुरू संत श्री गणेशनाथ बाबा चौक ते स्मशानभूमीपर्यंतचा हा रस्ता चिचोंडी पाटील गावाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

## एमआयडीसीत जुन्या वादातून युवकाला मारहाण

**अहिल्यानगर :** शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या वडगाव गुप्ता येथील आंबेडकर चौक परिसरात एका युवकाला जुन्या वादातून लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघा जणांव विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संदिप रावसाहेब चांदणे हे २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास वडगाव गुप्ता येथील आंबेडकर चौक परिसरातून आपल्या घरी जात होते. यादरम्यान त्यांचा मामभाऊ कैलास भाऊसाहेब ससाणे आणि रविंद्र भाऊसाहेब ससाणे हे दोघे तिथे आले. त्यांनी संदिप यांना अडवून अरेरावी केली आणि शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

## विद्याधामच्या तीन मल्लांची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या तीन खेळाडूंची जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीनंतर तालुक्यातील विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव होताना दिसत आहे तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा शैक्षणिक संकुलात नुकत्याच झालेल्या श्रीगोंदा तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील राजलक्ष्मी महेश चव्हाण हिने ३३ किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावला. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक संदीप घावटे व अमोल कातोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, पर्यवेक्षक एन. एस. डुंबरे, संजय देशपांडे, के. बी. काळे तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## आई तुळजाभवानीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाच्या तयारीला वेग : पलंगे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ च्या धार्मिक विधींच्या तयारीला वेग आला असून, उत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रम आणि विधी नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आज रोजी तुळजापूरला रोजी महत्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली अशी माहिती बैठकीला उपस्थित असलेले अहिल्यानगर येथील श्री तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश वसंत पलंगे,अभिषेक अनंत पलंगे (नगरचे तेली पलंगवाले) यांनी दिली

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ (शके ११४८) चा उत्सव दि. ११ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर मंदिराच्या प्रशासकीय कार्यालयात दुपारी ३.३० वाजता बैठक पार पडली. शारदीय नवरात्र महोत्सवाच्या तयारीबाबत मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालय कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत उप विभागीय अधिकारी ऑकार देशमुख यांच्यासह मंदिर तहसीलदार माया माने, उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील, श्री तुळजाभवानी पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम, धार्मिक व्यवस्थापक अमोल भोसले, अनुए धमाले, जयसिंग पाटील, नागेश शितोळे. तसेच अहिल्यानगर येथील श्री तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश वसंत पलंगे, अभिषेक अनंत पलंगे (नगरचे तेली पलंगवाले) व पालखी चे मानकरी भगत परिवार सदस्य उपस्थित होते.

## सर्कशीला राजश्रय व जनाधार मिळावा : चव्हाण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** सर्कशीच्या माध्यमातून कलाकारांच्या पोट पाण्याचा प्रश्न मिटावा म्हणून जगण्याची कसरत करावी लागते. समाज माध्यमांच्या प्रभावामुळे सर्कशीचा व्यवसाय अखेरच्या घटकामध्ये मोजत आहे. अस्सल भारतीय कला विशेषतः महाराष्ट्रीयन कला पुढील पिढ्यांना कळावी यासाठी सर्कस व्यवसायाला राजाश्रय व जनश्रय मिळायला हवा... रिंगो सर्कशीचे मालक गोविंद चव्हाण यांनी अत्यंत तळमळीने आपल्या भावना व्यक्त केल्या.



शहरामध्ये शेवगाव रस्त्यावर अर्जुना लॉन्ससमोर मंगळवारपासून (ता.२२) छोट्या स्वरूपाची सर्कस सुरू झाली आहे. १९९० च्या दशकापर्यंत सर्कशीचा व्यवसाय अत्यंत बहरामध्ये होता. याला जनाधार सुद्धा तेवढाच होता. न्यायालयाच्या आदेशानुसार सर्कशीमध्ये जंगली प्राणी वापरून त्यांच्याकडून कसरतीचे कामे करून घेणे याला अपराध समजला गेला. त्यानंतर सर्कशी मधील प्राणी गायब होऊन या व्यवसायाला अखेरची घरघर लागली. तंबू मधील उंच झोक्यावरून विविध प्रकारचे कलाप्रकार सादर करणे, विदूषकांची जुगलबंदी, मृत्यू गोलातील मोटरसायकल, प्राण्यांचे कसरतीचे प्रयोग, याबरोबरच सर्वाधिक लोकप्रिय प्रकार म्हणजे सायकलिंगचा होता. कलेमध्ये अत्यंत कसदार स्त्री-पुरुष सायकलपटू कडून सादर केली जाणारी कला रसिकांच्या टाळ्या मिळवणारी ठरे. पडद्यावरील गमतीजमतीपेक्षा प्रत्यक्षात विदूषकांकडून सादर होणाऱ्या मिमिक्रीला सुद्धा प्रेक्षक आवर्जून दाद देत. ग्रँड जम्बो सर्कस, एरिना सर्कस, भारत सर्कस, अशा विविध नावाजलेल्या सर्कशी देशभर चर्चेत होत्या. विशिष्ट प्रकारचा तंबू, स्टेडियम सारखी गॅलरी, लोखंडी कठडे उभारून केलेली वर्गवारी व मैदानाच्या मध्यभागी गोलाकार असलेले कलेचे व्यासपीठ हीच ती काय सर्कस ठरे. दोन तासाच्या मनोरंजनासाठी कलाकार अहोरात्र परिश्रम करत जीव धोक्यात घालून प्राण्यां बरोबर खेळ करत. एरिना सर्कस तर एरिना नावाच्या छोट्या मुलीच्या कसरतीच्या सादरीकरणावर देशभर गाजली. सर्कशीवर प्रेम करणारी या कलेला मनापासून दाद देणारी पिढी आता ज्येष्ठ झाली आहे. सर्वत्र असे खेळ सुद्धा बंद झाले आहेत. कसरतीचे अर्थशास्त्र बिघडल्याने तोट्यात चालणारा हा व्यवसाय आपोआप बंद पडला. समाज माध्यमांमधून करमणुकीची क्रांती झाली. करमणुकीची साधने बदलली. पूर्वी चित्रपट गृह मधील चित्रपट बघण्यासाठी रांगा लावणारे प्रेक्षक आता बंद झाल्याने चित्रपट गृहे शहरांमधील शोभेची वास्तू बनत चालली आहेत. आता सगळं काही इंटरनेट मय झाल आहे.

## ख्रिस्तवाणीचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**अहिल्यानगर :** ख्रिस्तवाणी शब्दगाणी समूहाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध, राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. मानवता प्रतिष्ठानाच्या पुढाकाराने ख्रिस्तवाणी शब्दगाणी समुह व दयासागर सामाजिक आरोग्य व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथे दिनांक ७ व ८ नोव्हेंबर २०२६ दरम्यान संपन्न होणाऱ्या दोन दिवशीय राज्यस्तरीय ख्रिस्ती कविसंमेलनात या पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. पंडिता रमाबाई गौरव पुरस्कार ठाणे येथील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ अनुपमा उजगरे यांना जाहीर झाला आहे. तसेच अन्य पुरस्कार पुढीलप्रमाणे देण्याचे ठरले. मानवता साहित्य गौरव पुरस्कार मंगला वागळे, बारामती, मानवता सामाजिक कार्य गौरव पुरस्कार, अहिल्या नगर येथील सुप्रसिद्ध कवयित्री आणि सामाजिक कार्यकर्त्या सरोज आल्हाट यांना देण्याचे ठरले आहे.

# २६ सप्टेंबरपर्यंत निर्णय नाही तर २८ पासून आमरण उपोषण! : संभाजी ब्रिगेड

### संभाजी महाराज चौकाच्या कामासह 'शंभुसृष्टी' थीम पार्कची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकाचे रखडलेले सुशोभीकरण व विकास काम तातडीने सुरू करावे, तसेच बनकरमळा येथील ३३ गुंठे आरक्षित खुल्या जागेत 'शंभुसृष्टी' थीम पार्क उभारावे, या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेड व नामदेव तुकाराम वारकरी परिषदेने आक्रमक भूमिका घेतली आहे. २६ सप्टेंबरपर्यंत मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास २८ सप्टेंबरपासून नगरपरिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा अंतिम इशारा मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

छत्रपती संभाजी महाराज चौकाचे काम अनेक वर्षांपासून रखडले आहे. चौकाच्या विकासासाठी प्रशासनासोबत अनेकदा बैठका झाल्या असून, डिझाईन व ठेकेदार निश्चितीबाबत चर्चा झाली आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. वारंवार निवेदने, आंदोलने व बैठका करूनही केवळ आश्वासने मिळत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. निवेदन देणाऱ्यांमध्ये संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिलीप लबडे, शहराध्यक्ष अक्षय दहातोंडे, नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष ह. भ. प. राजेंद्र होरे-माऊली, तालुकाध्यक्ष ह. भ. प. अंकुश खोरे-महाराज, संभाजी ब्रिगेडचे तालुका कार्याध्यक्ष प्रफुल्ल ऊर्फ



बापू जगताप, अल्पसंख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष सद्दाम शेख, शेतकरी आघाडीचे तालुका उपाध्यक्ष पांडुरंग खोरे, गणेश गडदे व सामाजिक कार्यकर्ते रविंद्र जाधव यांचा समावेश होता.

#### ३३ गुंठ्यांत 'शंभुसृष्टी'ची मागणी

बनकरमळा येथील ३३ गुंठे आरक्षित खुली जागा दीर्घकाळापासून वापराविना पडून आहे. या जागेवर छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहास व कार्याची माहिती देणारे 'शंभुसृष्टी' थीम पार्क उभारावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना विरंगुळ्याची सुविधा, मुलांसाठी ऐतिहासिक-सांस्कृतिक माहितीचे केंद्र आणि ज्येष्ठांसाठी उपयुक्त जागा उपलब्ध होईल. तसेच शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडून पर्यटनालाही चालना मिळू शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

#### 'आता आश्वासने नकोत, प्रत्यक्ष काम सुरु करा'

नगरपरिषद प्रशासनाने २६ सप्टेंबरपर्यंत मागण्यांवर निर्णय घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी. अन्यथा २८ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्यात येईल. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीची जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची राहील, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिलीप लबडे यांनी दिला.

> छत्रपती संभाजी महाराज चौकाचे काम अनेक वर्षांपासून रखडले आहे. अनेकदा बैठका होऊनही प्रशासन गांभीर्याने घेत नाही. आता केवळ आश्वासने नकोत, प्रत्यक्ष काम सुरू व्हावे; अन्यथा आम्ही २८ तारखेपासून उपोषणावर ठाम आहोत.
>
> **अक्षय दहातोंडे, शहराध्यक्ष, संभाजी ब्रिगेड**

# शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देणार : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीकडे शासन अतिशय गांभीर्याने पाहत आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी आजपासूनच पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, येत्या तीन दिवसांत शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भातील पहिली अधिसूचना निघणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. कोणत्याही परिस्थितीत शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. झालेल्या नुकसानीसाठी निधीची कम तरता पडू देणार नाही. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त म दत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्यासाठीही आवश्यक नियोजन करण्यात आले आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.



पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यांच्या दौऱ्यावर असताना कृषिमंत्री भरणे यांनी देऊळगाव, मोरगाव, मुर्टी, नावळी आणि कोळविहीरे या गावांना भेट देऊन प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची तसेच पाणी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी

आमदार राहुल कुल आणि पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे उपस्थित होते.कृषी मंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, पिकाची पाहणीकरून पावसातील खंडामुळे खरीप पिकांवर झालेल्या परिणामाची माहिती घेतली.

पुणे जिल्ह्यातील हवेली, जुन्नर, आंबेगाव, मावळ आणि मुळशी या तालुक्यांमध्ये २ ते ३ आठवड्यांचा पावसाचा खंड पडला आहे. भोर व वेल्हा तालुक्यांमध्ये ३ ते ४ आठवड्यांचा पावसाचा खंड असून, ४ आठवड्यांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड असलेल्या तालुक्यांमध्ये बारामती, शिरूर, पुरंदर, इंदापूर, दौंड आणि खेड या तालुक्यांचा समावेश असल्याची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली.

पावसातील दीर्घ खंडामुळे पुणे विभागातील खरीप पिकांवरही परिणाम झाला आहे. या परिस्थितीची केवळ आकडेवारीच्या आधारे पाहणी न करता प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन वस्तुस्थिती जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी आजपासूनच पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, कृषी व संबंधित विभागांकडून प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानीची अचूक नोंद करण्यात येत आहे.

पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम लक्षात घेऊन पंचनामे तसेच आवश्यक प्रस्तावांची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल, असा विश्वासही कृषिमंत्री भरणे यांनी व्यक्त केला.

# दखल

## पुणे विभागातील पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबरला मतदान

**पुणे :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून, संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान सदस्य पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान सदस्य अरुण लाड आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे विद्यमान सदस्य पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे विद्यमान सदस्य जयंत आसगावकर यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.निवडणुकीची अधिसूचना २९ सप्टेंबरला प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर आहे. मतदान २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार असून, मतमोजणी २७ ऑक्टोबरला होईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे.निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून पुणे विभागात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सर्व राजकीय पक्ष आणि प्रशासकीय विभागांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

## तिसरे अधिकारी मराठी साहित्य संमेलन ग्रंथ पुरस्कारासाठी नामांकनाचे आवाहन

**पुणे :** तिसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. पुणे महानगरपालिकेचा मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था, राष्ट्रीय पुस्तक न्यास, नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), आणि संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन आयोजित करण्यात येणार आहे.या संमेलनाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांची, तर स्वागताध्यक्षपदी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. नवलकिशोर राम यांची निवड करण्यात आली आहे. यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांची संयोजक म्हणून, तर महाराष्ट्र साहित्य परिषद आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास, नवी दिल्लीचे मा. योगेश सोमण व मा. राजेश पांडे यांची सहसंयोजक म्हणून निवड करण्यात आली आहे.या संमेलनाच्या निमित्ताने मागील वर्षांपासून शासकीय अधिकारी यांनी लिहिलेल्या विविध १२ साहित्य प्रकारांतील ग्रंथांना ग्रंथ पुरस्कार देण्यात येतात. ही परंपरा कायम ठेवत राज्यभरातील शासकीय अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या विविध साहित्य प्रकारांतील ग्रंथांची नामांकने मागविण्यात येत आहेत.ग्रंथ पुरस्कारांची सविस्तर माहिती तसेच अर्ज यशदाच्या ारहरूीहरवर.ॲस या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी विहित पद्धतीने ग्रंथ पुरस्कारासाठी नामांकन सादर करावे, असे आवाहन ग्रंथ पुरस्कार निवड समितीच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी ग्रंथ पुरस्कार निवड समितीचे सदस्य व्यंकटेश कल्याणकर (प्रकल्प संशोधक, यशदा, पुणे) यांच्याशी मो. ७७९८७०३९५२ या क्रमांकावर संपर्क साधावा. शासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने नामांकन सादर करावेत, असे आवाहन ग्रंथ पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष तथा यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी केले आहे.

## कोरेगाव भिमा येथील कंपनीतुन डंपरची चोरी

**तळेगाव ढमढेरे :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील एका कंपनीत लावलेला डंपर चोरीला गेल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील मारवल ब्रिक्स कंपनी येथे हमीद इनामदार यांचा एम एच १२ व्ही एफ २११९ हा डंपर आलेला असताना इनामदार यांनी १७ सप्टेबर रोजी डंपर कंपनीच्या आवारात लावून गेलेले होते, दोन दिवसांनी २० सप्टेबर रोजी इनामदार हे कंपनीमध्ये आले असता त्यांना त्यांचा डंपर नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी आजूबाजूला डंपरचा शोध घेतला असता डंपर मिळून आला नाही, तर डंपर चोरीला गेल्याचे निदर्शनास आले, याबाबत हमीद मकबुल इनाम दार (वय ५१ वर्षे सध्या रा. न्यायाती अलॅन सोसायटी वाघोली ता. हवेली जि. पुणे मुळ रा. कोरेगाव भिमा ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने शिक्रापूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार विकास सरोदे हे करत आहे.

## पोलीस अंमलदारांच्या वेतनातील तफावत दूर करण्याची मागणी

**पुणे :** सातव्या वेतन आयोगानुसार पोलीस अंमलदार व लिपिक कर्मचाऱ्यांच्या वेतनस्तरातील तफावत दूर करावी, अशी मागणी शिखर संस्थेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलीस म हासंचालक व वित्त सचिवांकडे केली आहे. संस्थेचे अध्यक्ष संपतराव जाधव व पुणे शहर उपाध्यक्ष रविंद्र कामठे यांनी याबाबत निवेदन दिले. पोलीस अंमलदारांना १० वर्षांनंतर ड-१०, २० वर्षांनंतर ड-१२ आणि ३० वर्षांनंतर ड-१६ वेतनस्तर लागू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.पोलीस अंमलदारांना दीर्घ ड्युटी, दंगल, सण-उत्सवातील बंदोबस्त तसेच जोखमीच्या परिस्थितीत काम करावे लागते.

# कारला पिकअप घासल्याच्या रागातुन चालकासह इतर दोघांना मारहाण

## शिक्रापूर पोलिसांकडून मारहाण प्रकरणी पाच जणांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावर कारला पिकअप घासल्याच्या वादातून कार मधील टोळक्याने पिकअप चालकासह पिकअपमधील महिला व युवकाला मारहाण करत रस्त्यावर गोंधळ घातल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलिसांनी योगेश बबन कर्डीले, कैलास आण्णा जगताप, अक्षय आप्पासाहेब अदमाने, रमेश सुभाष मिसाळ व ज्ञानेश्वर भगवान राऊत यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत सर्वांना अटक केली आहे.

**रस्त्यावर अपघात झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वादविवाद, भांडणे व मारामारी करु नये, कोणीही व्यक्ती अपघात जाणीवपूर्वक करत नाही असा काही प्रकार घडल्यास तत्काळ पोलिसांची मदत घ्यावी असे आवाहन शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी केले आहे.**

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावरून नारायण घोडके हे त्यांच्या ताब्यातील एम एच १४ एम टी ६९३८ या पिकअप मधून त्यांची आई छगाबाई घोडके, भाचा विजय काळे यांच्यासह पुणे बाजूने अहिल्यानगरच्या दिशेने जात असताना शिक्रापूर मध्ये शेजारुन चाललेल्या एम एच १२ झेड एस ०४३८ या क्रेटा कारला नारायण यांच्या पिकअपचा धक्का लागल्याने कारमधील युवकांनी खाली उतरत नारायण यांना शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण करु लागले यावेळी नारायण यांची आई छगाबाई घोडके व भाचा विजय काळे मध्ये आले असता सदर युवकांनी त्यांना देखील हाताने, लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी काठीने मारहाण केली, सदर घटनेत नारायण आसाराम घोडके, छगाबाई आसाराम घोडके, विजय सुभाष काळे हे जखमी झाले असून याबाबत नारायण आसाराम घोडके (वय २६ वर्षे रा. रुपीनगर, गोसावी हॉस्पिटल शेजारी निगडी पुणे, मुळ रा. दुमेगाव ता. गेवराई जि. बीड) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी योगेश बबन कर्डीले, कैलास आण्णा जगताप, अक्षय आप्पासाहेब अदमाने, रमेश सुभाष मिसाळ व ज्ञानेश्वर भगवान राऊत (सर्व रा. वाघोली ता. हवेली जि. पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश मुटेकर हे करत आहे.

# सोमेश्वर कारखाना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावभेटींचा धडाका

### सर्वपक्षीय दौरे; कार्यकर्त्यांची जमवाजमव, एकमेकांवर टीकास्त्र अन् सभासदांना कानपिचक्या

विनोद गोलांडे । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, विविध गटांकडून गावभेटी आणि सभासदांच्या भेटीगाठी सुरू झाल्या आहेत. आपल्या समर्थक कार्यकर्त्यांना सोबत घेत नेतेमंडळी गावोगावी दौरे करत सभासदांशी संवाद साधत आहेत.

निवडणुकीच्या वातावरणात प्रत्येक गटाकडून आपापल्या शैलीत प्रचाराला सुरुवात झाली असून, बैठका, वैयक्तिक भेटी आणि चर्चांमधून सभासदांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचवेळी विविध गटांकडून एकमेकांच्या भूमिकांवर टीकास्त्र सोडले जात असल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे.

कारखान्याच्या सभासदांना मतदानाचा अधिकार असल्याने प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे सभासदांच्या भेटीगाठींना विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, गावागावांत राजकीय चर्चांना उधाण आले आहे. काही ठिकाणी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बैठका होत असून, सभासदांना आपल्या बाजूने मतदान करण्यासाठी आपापल्या पद्धतीने कानपिचक्या दिल्या जात आहेत.

निवडणूक जसजशी जवळ येईल, तसतशी गावभेटी, बैठका आणि प्रचारातील रंगत वाढण्याची शक्यता असून, सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीकडे सभासदांसह परिसराचे लक्ष लागले आहे.



दहिवाळ आणि शहाणे परिवारातर्फे दगडूशेठ गणपतीला अर्पण करण्यात आलेला १५१ किलोचा मोतीचूराचा मोदक.

# दगडूशेठ गणपतीला १५१ किलोचा मोदक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** दहिवाळ आणि शहाणे परिवारातर्फे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला १५१ किलो मोतीचूराच्या भव्य मोदकाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. जालना जिल्ह्यातील परतूर येथील एकनाथराव दहिवाळ परिवाराने हा मोदक तयार केला. तीन दिवसांत सहा कारागिरांच्या मदतीने मोदक साकारण्यात आला.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने उत्सवाच्या १३४ व्या वर्षी हा मोदक उत्सव मंडपात टेम्पोतून आणण्यात आला. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.मोदकासाठी मोतीचूर लाडू, तूप, साखर, ड्रायफ्रुट आणि केशर यांचा वापर करण्यात आला. सुजाता एकनाथराव दहिवाळ, अमोल शहाणे, दिपाली शहाणे, साक्षी रोहित शहाणे आणि माहेश्वरी मायरा यांच्या वतीने हा नैवेद्य अर्पण करण्यात आला. साक्षी रोहित शहाणे, अमोल शहाणे आणि शहाणे परिवाराने दगडूशेठ गणपतीला नवस केला होता. नवस पूर्ण झाल्यानंतर परिवारातर्फे हा मोदक अर्पण करण्यात आला. नैवेद्य दाखविल्यानंतर मोदकाचा प्रसाद गणेशभक्तांना वाटण्यात आला.

# प्रचार साहित्य, फलक तत्काळ हटविण्याचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी. पाचही जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत आचारसंहितेचा भंग करणारे राजकीय पक्षांचे जाहिरात फलक, होर्डिंग्ज, भित्तीपत्रके तसेच भिंतीवरील मजकूर तत्काळ हटवावा, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिले.



पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, जिल्हा पोलिस अधीक्षक यांची निवडणुकीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक झाली. या बैठकीत तेली-उगले यांनी निवडणूक प्रशासनाला सूचना दिल्या.भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व जिल्ह्यांत आवश्यक कक्ष, भरारी पथके, स्थिर सर्वेक्षण पथके आणि व्हिडिओ सर्वेक्षण पथके स्थापन करावीत. शासकीय विश्रामगृहे, शासकीय व निमशासकीय जागा, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागा, धार्मिक स्थळे आणि शाळांचा राजकीय प्रचारासाठी वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी. आचारसंहितेचा भंग आढळल्यास तत्काळ गुन्हे दाखल करावेत, असेही त्यांनी सांगितले.विभागीय आयुक्त कार्यालयासह प्रत्येक जिल्ह्यात निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली आचारसंहिता कक्ष स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. म तदान केंद्रांची प्रारूप यादी प्रसिद्ध करावी तसेच निवडणुकीसंदर्भात चुकीची माहिती पसरू नये, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही देण्यात आले.जिल्हा स्तरावर माध्यम प्रमाणीकरण व माध्यम संनियंत्रण समित्या कार्यान्वित करून दूरचित्रवाणी, आकाशवाणी, खासगी एफएम आणि समाजमाध्यमांवरील राजकीय जाहिरातींच्या पूर्वप्रमाणीकरणाबाबत राजकीय पक्षांना माहिती द्यावी, असेही सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त आयुक्त तुषार ठोंबरे यांनी सांगितले.

# भीमाशंकर कारखान्याकडून ऊस उत्पादकांचा सन्मान

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** दत्तात्रयनगर पारगाव ता. आंबेगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या अधिमंडळाच्या वार्षिक सभेत ऊस पिक स्पर्धेतील पात्र शेतकरी आणि गावांचा सन्म ान करण्यात आला. कारखान्याचे संस्थापक-संचालक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या हस्ते धनादेश, सन्मानचिन्ह, शाल व साडी देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले.

यावेळी भीमाशंकर कारखाना चेअरमन बाळासाहेब बेंडे, व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील, शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे, संचालक किरणताई वळसे पाटील, पूर्वा वळसे पाटील, संचालक मंडळ, तालुक्यातील पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.हंगामनिहाय सर्वाधिक ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आडसाली गटात प्रथम अजय चव्हाण, द्वितीय दिलीप काळे, तृतीय मारुती पिंगळे; पूर्वहंगाम गटात प्रथम रामदास डोके, द्वितीय शिवाजी लोखंडे, तृतीय देवराम वाघ; तर खोडवा गटात प्रथम स्वाती करंडे, द्वितीय दत्तात्रय कोकणे, तृतीय राजेंद्र बाणखेले यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्षेत्र व परिसरातून एका नावाने सर्वाधिक ऊस गाळपास देणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये प्रथम रामदास रोडे, द्वितीय सदाशिव पवार, तृतीय सुभाष वाळुंज यांचा सन्मान झाला.एका गावातून १५ हजार मेट्रिक टनांपेक्षा अधिक आणि एकूण ऊसापैकी ९० टक्क्यांपेक्षा अधिक ऊस गाळपास दिलेल्या गावांमध्ये खडकी गावाचा गौरव करण्यात आला. आंबेगाव तालुक्यात शिंगवे प्रथम, काठापूर बुद्रुक द्वितीय, निरगुडसर तृतीय; शिरूर तालुक्यात भीमाशेत प्रथम, कवठे द्वितीय, करंदी तृतीय; तर जुन्नर तालुक्यात पारगाव मंगरूळ प्रथम, खोडद द्वितीय, नारायणगाव तृतीय क्रम ांकावर राहिले.

# पावसाने पाठ फिरवल्याने दौंड तालुक्यात बळीराजा संकटात

## कृषीमंत्री दत्तामामा भरणे, आ. राहुल कुल, माजी आ. रमेश थोरात शेतकऱ्यांच्या बांधावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत–** दौंड तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. सुरुवातीला झालेल्या पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली. मात्र, त्यानंतर पावसाने मोठी उघडीप दिल्याने पिके संकटात सापडली आहेत. त्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांपुढे संकट मोठे असले तरी त्यांना मदत करताना राज्य शासन प्रसंगी नियम निकष बाजूला ठेवून भरीव मदत करेल असे आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांना दिले.

शेतकऱ्यांच्या बांधावर गेल्याशिवाय शेतकऱ्यांची परिस्थिती समजणार कशी,



पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून दौंड तालुक्यातील अनेक भागांत पिकांची अवस्था चिंताजनक झाली आहे. दौंड तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत बुधवारी २३ सप्टेंबर रोजी पार पडला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी आ. राहुल कुल, माजी आ. रमेश थोरात व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

हे नैसर्गिक संकट मोठे असल्यामुळे या काळात शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य सरकार कमी पडणार नाही. त्याबाबत मुख्यमंत्र्यांनीही आश्वासन दिले आहे. यासोबतच पीकविमा लागू करतानाही नियम अटी न पाहता राज्य शासनाकडून मदत तसेच पीकविम्याचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. शेतकरी संकटात असताना सर्वजण त्यांच्या पाठीशी आहेत, असेही कृषिमंत्री भरणे म्हणाले.

# तांदूळवाडीत ‘श्री गणेशा आरोग्याचा’ अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** महाराष्ट्र शासनाचा उपक्रम मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या समन्वयाने राबविण्यात येत असलेल्या ‘श्री गणेशा आरोग्याचा’ या आरोग्य अभियानांतर्गत ११८ सप्टेंबर रोजी तांदूळवाडी येथील शिवनगर गणेश मंडळाच्या वतीने सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये शासकीय महिला ग्रामीण रुग्णालय, बारामती येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी परिसरातील नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी केली. यावेळी रोगनिदान, आवश्यक शस्त्रक्रियांसाठी मार्गदर्शन, रक्त तपासणी, ईसीजी तसेच इतर विविध वैद्यकीय तपासण्या मोफत करण्यात आल्या. तपासणीनंतर गरजेनुसार नागरिकांना औषधांचे वाटपही करण्यात आले.

या उपक्रमादरम्यान नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड मोफत काढून देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात १५० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आरोग्य तपासणी करून घेतली.यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापू भोई, डॉ. मयूर बेलदार, डॉ अभिषेक घुले,पंढरी करणे, जाई साळी, श राहुल नककावार, योगिता गडदरे, रियाज शेख, म हेश खोपडे यांच्यासह शिवनगर कला क्रीडा प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

**सार्वजनिक सूचना**

सूचित करण्यात येते की, प्रकल्प प्रवर्तक मे. एनर्जिया रकाय आय व्हेंचर्स यांना गट क्रमांक २९४ (पी), गाव भुकुम, तालुका मुळशी, जि. पुणे ४१२११५ येथील प्रस्तावित निवासी व व्यावसायिक प्रकल्पासाठी, पर्यावरण मंजुरी ओळख क्रमांक EC26B3812MH5249325A दिनांक २७.०७.२०२६ अन्वये सुधारित पर्यावरण मंजुरी देण्यात आली आहे. मंजुरी पत्राच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध असून त्या **http://parivesh.nic.in** या संकेतस्थळावरही पाहता येतील.

दिनांक -24/09/2026 **मे. एनर्जिया स्काय आय व्हेंचर्स**

## द•ख•ल



### दहिफळ विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**अमरापुर :** माजी विद्यार्थ्यांच्या एकमताने पदाधिकाऱ्यांची निवड; शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार

दहिफळ जुने : श्री मारुतरावजी धुळे पा. शिक्षण संस्थेच्या दहिफळ माध्यमिक विद्यालय, दहिफळ जुने, ता. शेवगाव येथे माजी विद्यार्थ्यांची सभा उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. इंगावले सर होते. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक इंगावले सर यांनी सांगितले की, माजी विद्यार्थी संघ स्थापनेचा मुख्य उद्देश विद्यालयाचा सर्वांगीण विकास साधणे, माजी विद्यार्थ्यांचे अनुभव व सहभाग यांचा लाभ वर्तमान विद्यार्थ्यांना तसेच शाळेला मिळवून देणे हा आहे. शाळेचा शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, माजी विद्यार्थी व विद्यालय यांच्यातील भावनिक संबंध अधिक दृढ करणे, शाळेच्या विकासात लोकसहभाग वाढविणे तसेच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे, हे संघाचे प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यालयाच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महेश शेळके, गणेश कुठारे, अजिनाथ कचरे, हरिभाऊ बेडके, अभिषेक भोसले, ज्येष्ठ शिक्षक नंदवरे अंबादास, शेख सांदू, वाघमारे यशोदारास, जाधव रणजित, श्रीमती बोडखे मॅडम, व्यवहारे विकास, बर्डे भाऊसाहेब, लिंभारे राजाराम, आरगळे देवीदास, लिंभारे गौरख यांच्यासह माजी विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सर यांनी केले. तर माजी विद्यार्थी महेश शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले. नव्याने स्थापन झालेल्या माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून विद्यालयाच्या विकासाला चालना देण्याचा आणि माजी विद्यार्थी व शाळेतील भावनिक नाते अधिक दृढ करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### पारनेर आगारामार्फत विशेष अष्टविनायक दर्शन यात्रा

**पारनेर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) पारनेर आगारामार्फत गणेशोत्सवानिमित्त भाविकांसाठी 'विशेष अष्टविनायक दर्शन' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. एकाच दिवसात महाराष्ट्रातील आठही अष्टविनायक मंदिरांचे दर्शन घेता यावे, यासाठी आगाराकडून विशेष बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबतची माहिती आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांनी दिली. गणेशोत्सवाच्या काळात अष्टविनायक मंदिरांमध्ये दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक गर्दी करतात. भाविकांची गैरसोय टाळून सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पारनेर आगाराने ही विशेष यात्रा आयोजित केली आहे. या यात्रेद्वारे भाविकांना मोरगाव, सिद्धटेक, पाली, महड, थेऊर, लेण्याद्री, ओझर आणि रांजणगाव या आठही गणेश मंदिरांचे दर्शन घेता येणार आहे. या विशेष अष्टविनायक दर्शन यात्रेसाठी पूर्ण तिकीट दर १ हजार ४६५ रुपये निश्चित करण्यात आला आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ७४० रुपये, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी केवळ ७ रुपये तिकीट दर ठेवण्यात आला आहे. त्यामुळे विविध वयोगटातील भाविकांना अष्टविनायक दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. यात्रेसाठी इच्छुक भाविकांनी आगाऊ संपर्क करून आवश्यक माहिती घ्यावी, असे आवाहन पारनेर आगाराच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, कुसकर आणि सागर लोंढे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### त्रिमूर्ती महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी



**ढोरजळगाव :** त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ढोरजळगाव ने येथे शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण महर्षी साहेबरावजी घाडगे पाटील शैक्षणिक व क्रीडा संकुलाचे मुख्य प्रशासक सचिन कर्डिले होते.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चोळके प्राचार्य डॉ विनोद भोईटे यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चोळके सर म्हणाले की कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गरीब, कष्टकरी, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे, त्यांनी स्वावलंबी जीवन जगावे, यासाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे महान कार्य त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रदीप नवल, नवनाथ रकटे, आकाश वाघ, संदीप घोडेचोर, हरिश्चंद्र मोरे, संजय सानप, प्राध्यापक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयात 'आरंभ २०२६' इंडक्शन कार्यक्रम उत्साहात




**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'आरंभ २०२६' इंडक्शन कार्यक्रमाची उत्साहात सुरुवात झाली. नव्याने महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाची दिशा, आधुनिक तंत्रज्ञान, करिअरच्या विविध संधी, कौशल्यविकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाची ओळख करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमास कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. स्नेहा शेगर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा. निर्मल कोठारी, इलेक्ट्रिकल विभागप्रमुख प्रा. निलेश नागरे, आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागप्रमुख प्रा. निवृत्ती चौधरी, सिव्हिल विभागप्रमुख प्रा.रविंद्र नवले, मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा. अमोल खतोडे, प्रा. सचिन पोखरकर यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रा. विशाखा वाघचौरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा. राजू वाकळे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके यांनी शुभेच्छा दिल्या.

# कुपोषण मुक्तीसाठी बालकांना दत्तक घेणार : भंडारी

## अंगणवाडी सेविका व मदतनीस कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राष्ट्रीय पोषण महिन्यात जिल्ह्यातील प्रत्येक अंगणवाडी केंद्रात प्रभावी काम होईल यासाठी अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी विशेष प्रयत्न करावेत. सध्या सुरू असलेल्या सेवा संकल्प अभियानातंर्गत जास्तीत जास्त लाभार्थींना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा. जिल्ह्यात अंगणवाडी सेविकांचे काम चांगल्या पध्दतीने चालू आहे. जिल्ह्यात कुपोषित बालकांची समस्या मोठी असून अशा कुपोषित बालकांना माझ्यासह जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी मिळून दत्तक घेवून त्यांना कुपोषणमुक्त करण्यासाठीचा खर्च उचलणार आहेत. याशिवाय अंगणवाडी केंद्रात स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, लाईट, पंखे अशा सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश ग्रामपंचायतींना दिले आहेत. तसेच ज्या अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची जागा नाही त्यांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत जागा उपलब्ध करून देणार आहे, असे अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सांगितले.

अहिल्यानगर येथील अंगणवाडी सेविका व मदतनीस कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि राष्ट्रीय पोषण माह अभियान अंमलबजावणी बैठक बुधवारी टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, प्रकल्प अधिकारी दीपक मेहेत्रे, पूजा ढास, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी माणिकराव साबळे, जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीचे चेअरमन संजय कडूस, किशोर जेजूरकर, राजेंद्र शेडाळे, पतसंस्थेच्या चेअरमन सुमन सप्रे, व्हा.चेअरमन आशा पवार, सचिव स्मिता औटी, संचालक सुलभा जाधव, अंजना ठाणगे, अनिता गोरे, कालिंदा शिंदे, नसिम शेख, विद्या दुसुंगे, आशा दारकुंडे, कविता कापसे, रूपाली जाधव, शैलजा उदमले, शोभा शेवाळे, नैना चाबुकस्वार, राजश्री कोल्हे, ताराबाई माळवदे, लिपीक अल्ताफ शेख, गौरी चावक आदींसह जिल्हाभरातील सभासद महिला उपस्थित होत्या.

चेअरमन सुमन सप्रे यांनी सांगितले की, सध्या राज्यात सेवा संकल्प अभियान सुरु असून या काळात राष्ट्रीय पोषण माहच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस विशेष प्रयत्न करीत आहेत. या काळात गर्भवती माता, स्तनदा माता, बालकांच्या पोषण स्तरात अधिक सुधारणा करून अंगणवाडी केंद्र मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस पतसंस्था सभासद हिताचा कारभार करत असून सभासदांना आर्थिक आधार देण्याचे काम करीत आहे. संस्थेचे ९८५ सभासद असून ३१ मार्च २०२६ अखेर वसूल भागभांडवल २ कोटी ५४ लाख ७२ हजार ८०५ रुपये आहे. संस्थेचे रिझर्व्ह फंड ४७ लाख ८१ हजार ८७२ रूपये आहे. संस्थेस गत आर्थिक वर्षात २१ लाख १९ हजार ९४० रुपये नफा झालेला आहे. वार्षिक सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना चर्चेअंती सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंवालन शोभा शेवाळे यांनी केले तर रूपाली जाधव यांनी आभार मानले.

# मंचावर 'बाबा' आला, प्रयोग सुरू झाले अन् विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत प्रश्नचिन्ह!

## तिसगावच्या शाळेने दिला वैज्ञानिक विचारांचा अनोखा धडा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी शहर :** शाळेतील विद्यार्थी कार्यक्रमासाठी शांतपणे बसलेले... वातावरणात उत्सुकता... आणि कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच अचानक मंचावर एका बाबाचा प्रवेश झाला. त्यानंतर सुरू झाले एकामागून एक प्रयोग. काही प्रयोग पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटले, काही क्षण हशा पिकला, तर काही प्रसंगांनी कुतूहल अधिकच वाढले. मात्र हा केवळ मनोरंजनाचा खेळ नव्हता. ज्याला आपण 'चमत्कार' समजतो, त्यामागे नेमके काय दडलेले असते, याचा शोध विद्यार्थ्यांनी याच मंचावर घेतला. गणेशोत्सव आणि चमत्कार चिकित्सा दिनाचे औचित्य साधून श्री वृद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तिसगाव येथे झालेला 'संतांची शिकवण - अंधश्रद्धा निर्मूलन' हा उपक्रम त्यामुळे विशेष ठरला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मा. प्रा. शशिकांत गायकवाड, अक्षय वायकर आणि विष्णू गायकवाड यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध प्रयोग सादर केले. सुरुवातीला बाबाच्या वेशातील व्यक्तीने केलेले प्रयोग विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेत होते. मात्र प्रत्येक प्रयोगानंतर त्यामागील कारण स्पष्ट केले जात होते आणि तेव्हा विद्यार्थ्यांच्या लक्षात येत गेले की, डोळ्यांना दिसणारी प्रत्येक आश्चर्यकारक गोष्ट चमत्कार नसते; तिच्यामागे विज्ञान, तंत्र किंवा मानवी मानसशास्त्र असू शकते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य संजय मस्के होते. यावेळी उपप्राचार्य श्रीमती कवडीवाले, पर्यवेक्षक ताठे सर, सूत्रसंचालक तथा विज्ञान शिक्षक आदिनाथ शिदोरे सर, राऊत सर, पवार सर, भिसे सर, जाधव सर, अकोलकर सर, शिंदे पी. एस. सर, कोतकर सर, शिरसाट सर यांच्यासह शिक्षकवृंद, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील वादानंतर दोघांना तडकाफडकी हलवले!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

## पोलीस अधीक्षकांचा आदेश; संदीप राऊत आश्वीला, संभाजी गर्जे आरसीपी श्रीरामपूरला

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दोन पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये झालेल्या कथित वादाचे प्रकरण आता थेट पोलीस अधीक्षकांच्या पातळीवर पोहोचले असून, प्राथमिक चौकशीला अडथळा येऊ नये म्हणून दोन्ही कर्मचाऱ्यांना तडकाफडकी त्यांच्या सध्याच्या नियुक्तीच्या ठिकाणाहून हलविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी हा आदेश काढला आहे.

श्रीगोंदा पोलीस ठाण्यात किरकोळ कारणातून दोघांमध्ये वाद झाल्या त्याच्या दैनिक राष्ट्र सह्याद्री दैनिकात बातम्या प्रकाशीत झाल्यावर प्रशासनाला खडबडून जाग आली आणि पोलीस अधीक्षक यांच्याअधिकृत आदेशानुसार पोकाँ/२६५५ संदीप पोपट राऊत यांची श्रीगोंदा पोलीस ठाण्यातून आस्वी पोलीस ठाण्यात, तर पोकाँ/५७४ संभाजी भारत गर्जे यांची श्रीगोंदा पोलीस ठाण्यातून आरसीपी, श्रीरामपूर येथे तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आली आहे. दोघांनीही नव्या ठिकाणी तत्काळ हजर होऊन कामकाज पाहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आता चौकशी समितीच्या अहवालात नेमके काय निष्पन्न होते आणि त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांवर पुढील कोणती कारवाई होते, याकडे पोलीस दलासह तालुक्याचे लक्ष लागले आहे. पोलीस ठाण्यातील अंतर्गत वादाच्या चर्चेला आता अधिकृत चौकशीची जोड मिळाल्याने 'नेमके घडले तरी काय?' हा प्रश्न आणखी गडद झाला आहे.

**'बदली' नव्हे, चौकशी पूर्ण होईपर्यंत तात्पुरते स्थलांतर!**

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विभागीय चौकशी शाखेने जारी केलेल्या आदेशात, संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध प्राप्त झालेल्या कसुरी अहवालाच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी आदेशित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. चौकशी प्रक्रियेस बाधा येऊ नये म्हणून दोघांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या ठिकाणी पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कामकाज पाहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यामुळे ही कारवाई केवळ नेहमीची प्रशासकीय बदली नसून, चौकशीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेली तात्पुरती नियुक्ती असल्याचे आदेशातून स्पष्ट होते.

'मस्करी'च्या जबाबानंतरही चौकशी कायम

श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील कथित वादानंतर संबंधित कर्मचाऱ्यांनी चेष्टा-मस्करीदरम्यान आवाज वाढल्याने गैरसमज झाल्याचे जबाब दिल्याची चर्चा होती. मात्र, त्यानंतरही वरिष्ठ पोलीस प्रशासनाने प्राथमिक चौकशीचा निर्णय घेतल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे.

# ढोल-ताशा, लेझीमच्या गजरात कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीचा जल्लोष




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेचे श्री जगदंबा विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, राशीन येथे आज विविध उपक्रमांनी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी ढोल-ताशा, लेझीम, टिपऱ्या तसेच पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत राशीन शहरातून भव्य मिरवणूक काढली.

मिरवणुकीत विद्यार्थिनींचा ढोल-ताशा पथकातील सहभाग विशेष आकर्षण ठरला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची आठवण करून देणारी वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. ढोल-ताशांचा निनाद, लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांचे सादरीकरण आणि टिपऱ्यांच्या ठेक्यामुळे संपूर्ण राशीन शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी ॲड. सुरेश शिंदे, अशोक जंजिरे, डॉ. विजय चव्हाण, सुभाष जाधव, जितेंद्र शेटे, अंबादास गव्हाणे, कानगुडे सर, सय्यद सर, सोनवणे सर, झगडे सर उपस्थित होते. कार्यक्रमास उपमुख्याध्यापक संग्राम राक्षे, पर्यवेक्षक शिवाजी बाबर, पर्यवेक्षक किशोर करपे, भिसे सर, बिबीशन चव्हाण, विकी साळवे सर, शरद पवार सर यांच्यासह श्री जगदंबा विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संशोधन विचार भावनेपुरता मर्यादित न राहता व्यावहारिक पातळीवर विकसित : डॉ. काळोखे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी शहर :** विद्यार्थ्यांच्या मनात असलेल्या कल्पना, प्रश्न आणि समस्यांकडे पाहण्याची वैज्ञानिक दृष्टी यांना योग्य व्यासपीठ मिळाले, तर त्यातून समाजोपयोगी संशोधनाची निर्मिती होऊ शकते. आजच्या जनरेशन झेड पिढीमध्ये नैसर्गिक प्रतिभा आणि नव्या संकल्पना मांडण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. या क्षमतेला संशोधनाची जोड देत विद्यार्थ्यांनी जागतिक स्पर्धेच्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे. संशोधन हा मानवी प्रगतीचा मूलाधार असून समाजातील प्रत्येक क्षेत्रातील बदलामागे संशोधनाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

बिडकर सुजय जयकुमार यांनी 'पाथदर्शक : लो कॉस्ट आयओटी बेस्ड रोड क्वालिटी मॅपर विथ ऑटोमॅटिक एनएचएआय इंटिग्रेशन' हा तंत्रज्ञानाधारित प्रकल्प सादर केला. शेळके भाग्यश्री भाऊसाहेब यांनी 'इकोगाऊ : नॅचरल अँटी-डॅंड्रफ सोप फ्रॉम काऊ युरिन' हा पर्यावरणपूरक संशोधन प्रकल्प मांडला.

भाबड शामल सुनील व मिरपगार कांचन दीपक यांनी 'स्मार्ट इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टम', घोंगडे ज्ञानेश्वर अशोक यांनी 'इफेक्ट ऑफ गार्लिक एक्स्ट्रॅक्ट ऑन मेलीबग्स', तर पालवे सुबोध राजेंद्र व गर्जे वैभव कल्याण यांनी 'मिल्क अडल्टरेशन (सॉल्ट) डिटेक्शन किट' हे संशोधन प्रकल्प सादर केले.

मानवी वर्तन आणि बदलत्या जीवनशैलीशी संबंधित विषयांनाही विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या कक्षेत आणले. शिरसाट ओमकार ब्रह्मदेव यांनी 'भावनिक नियमन, शैक्षणिक विलंबित संतुष्टी आणि स्क्रीन टाईम : सहसंबंधात्मक अभ्यास', तर डमाळे पुनम सुरेश यांनी 'एकल महिलांचा एकटेपणा आणि मानसिक कल्याण : एक अभ्यास' हे प्रकल्प सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अमोल गोसावी यांनी केले, तर आभार प्रा. सारिका लाडे यांनी मानले.

# नाना पाटेकरांकडून विशाल नगरे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**भाळवणी :** नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून, जलसंधारण, पाणी संवर्धन व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले विशाल नगरे यांच्या कार्याचे, ज्येष्ठ अभिनेते तथा महाराष्ट्र भूषण नाना पाटेकर यांनी तोंडभरून कौतुक केले.

गणेशोत्सवानिमित्त अभिनेते नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी भेट झाली असता, त्यांनी विशाल नगरे यांच्या सामाजिक व जलसंधारणाच्या कार्याची माहिती घेत त्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. तसेच शाबासकीची थाप देत भविष्यातही समाजासाठी असेच चांगले कार्य सुरू ठेवावे अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी नाना पाटेकर यांचे चिरंजीव मल्हार पाटेकर, तसेच थोरात साहेब यांनीही विशाल नगरे यांच्या कार्याला मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले. गावच्या सुपुत्राच्या सामाजिक कार्याची नाना पाटेकर यांच्यासारख्या मान्यवरांकडून झालेली दखल ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

# पोखरीतील आदिवासी बांधवांना वनहक्काच्या जमिनींचे सातबारा प्रदान

## सुजित झावरे यांच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील पोखरी परिसरातील आदिवासी बांधवांना वनहक्क कायद्यांतर्गत वनजमिनींचे हक्क मिळवून देण्यासाठी सुजित झावरे पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. शासन स्तरावर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे प्रदान करण्यात आले.

पोखरी परिसरातील अनेक आदिवासी कुटुंबे पिढ्यान्पिढ्या वनजमिनीवर वास्तव्यास असून संबंधित जमिनीवर त्यांचा पारंपरिक वापर व उपजीविका अवलंबून होती मात्र जमिनीच्या मालकी हक्काचा अधिकृत दस्तऐवज नसल्यामुळे या कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी येत होत्या. स्वतःचे घर आणि कसण्यासाठी जमीन असूनही अधिकृत हक्कपत्र नसल्याने अनेक कुटुंबे शासकीय सुविधांपासून वंचित राहत होती.वनहक्क कायद्यांतर्गत त्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात अशी मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. पोखरी गावचे सरपंच सतीश पवार पाटील यांनी आदिवासी बांधवांच्या या प्रश्नाकडे सुजित झावरे पा.यांचे लक्ष वेधले. आदिवासी समाजाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागण्यासाठी झावरे पा.यांनी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा केला.

वनहक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे हातात मिळाल्याने आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काची अधिकृत नोंद प्राप्त झाली आहे.



पोखरी परिसरातील आदिवासी समाजाला केवळ जमिनीचा हक्क मिळाला नसून त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्कापासून वंचित राहावे लागू नये तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना मिळावा यासाठी यापुढेही प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सुजित झावरे पा.यांनी स्पष्ट केले.

पारनेर तालुक्यातील इतर गावांमध्येही वनहक्क कायद्यांतर्गत पात्र आदिवासी बांधवांनी आपल्या जमिनीचे प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावेत असे आवाहन सुजित झावरे पाटील यांनी केले आहे.

यावेळी पोखरीचे सरपंच सतीश पवार पाटील, आदिवासी नेते आनंदराव केदार, राहुल मधे तसेच आदिवासी समाजातील बांधव उपस्थित होते.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

गुरुवार दि.२४ सप्टेंबर २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८


## जुन्या वादातून तरुणाला कत्तीने मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : जुन्या वादाच्या कारणावरुन आरोपींनी आदित्य राठोड या तरुणाला लोखंडी रॉड व कत्तीने मारहाण करून जखमी केल्याची घटना राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे दि. २० सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. आदित्य रामचंद्र राठोड, वय २० वर्षे, हा तरुण राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे कुटुंबासह राहत आहे. दि. १८ सप्टेंबर रोजी आदित्य राठोड व गौरव खाडे यांचे गावात वाद झाले होते, परंतु कोणीही पोलीस ठाण्यात तक्रार दिली नव्हती. दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास आदित्य राठोड हा डिग्रस गावामध्ये बाला साबळे यांच्या पान टपरीवर पान खाण्याकरीता गेला होता. त्यावेळी आरोपी तेथेच उभा होते. आरोपींनी मागील वादाच्या कारणावरुन आदित्य राठोड याला लोखंडी रॉड व कत्तीने मारहाण करून जखमी केले. घटनेनंतर आदित्य रामचंद्र राठोड याने राहुरी पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी गौरव माणिक खाडे, ऋषीकेश बाबासाहेब खाडे, महेश बाबासाहेब खाडे, सर्व रा. डिग्रस, ता. राहुरी, या तीन जणांवर गुन्हा रजि. नं. १०७८ /२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१) प्रमाणे मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# ‘मीही शेतकरी; शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव’

### रांजणगाव देशमुख, अंजनापूर सौर प्रकल्पांचे लोकार्पण; सात हजार शेतीपंपांना दिवसा वीज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : निळवंडेचे पाणी शेताच्या बांधापर्यंत पोहोचले असून आता त्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग व्हावा, यासाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्याचे काम मार्गी लागले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत रांजणगाव देशमुख व अंजनापूर येथे उभारण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे सुमारे सात हजार शेतीपंपांना दिवसा वीज मिळणार आहे.

रात्री-अपरात्री बिबट्याच्या भीतीत शेतात जाऊन वीजेची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी मला चांगल्या प्रकारे समजतात. कारण मी स्वतः शेतकरी आहे, असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी



केले. रांजणगाव देशमुख व अंजनापूर येथे ३२ कोटी रुपये निधीतून उभारण्यात आलेल्या १० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण आमदार काळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी ते बोलत होते. आमदार काळे म्हणाले, २०१९ मध्ये जनतेने विश्वासाने आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. पाणी, वीज व रस्ते या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. निळवंडेचे पाणी लाभक्षेत्रातील गावांपर्यंत पोहोचल्याने पूर्वी टँकरवर अवलंबून असलेल्या भागातील परिस्थितीत बदल झाला आहे. उर्वरित पाणी पाझर तलावांपर्यंत पोहोचविण्यासाठी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या कामांनाही गती देण्यात आली आहे.

झगडेफाटा ते वडगाव पान राज्य मार्ग क्रमांक ६५च्या कामासाठीही निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

**‘मी जे बोलतो, तेच करतो आणि जे करतो, तेच बोलतो’**

विकासकामे मंजूर करून आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. श्रेय घेण्यासाठी कोणी पुढे आले तरी जनतेला पाठपुरावा कोणी केला आणि काम कोणी केले, हे माहीत आहे. उद्घाटने करण्यापुरते माझे पद नसून प्रत्येक दिवस जनतेच्या कामासाठी देत असल्याचे आमदार काळे यांनी सांगितले.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे, उपकार्यकारी अभियंता डी. डी. पाटील, सिगल इंडिया लिमिटेडचे अय्यालुसामी सरवणम, इन्फिसोल एनर्जी लिमिटेडचे संचालक दीपक लड्डा, गटविकास अधिकारी स्वप्नील वाळुंज यांच्यासह पदाधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व नागरिक उपस्थित होते.

## जाळ्यात अडकलेल्या दहा फुटी अजगराची सुखरूप सुटका

### वनविभाग व इको वन्यजीव बचाव टीमची संयुक्त कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : विसापूर-गोटेवाडी परिसरातील अंबोरे मळा येथे बुधवारी (दि. २३) सकाळी जाळ्यात अडकलेला तब्बल दहा फूट लांबीचा अजगर आढळून आला. शेतकरी भाऊसाहेब आंबोरे यांनी याची माहिती तत्काळ वनविभाग आणि इको वन्यजीव बचाव टीमला दिली. त्यानंतर पथकाने घटनास्थळी दाखल होत अजगराची काळजीपूर्वक सुटका केली.



वनपरिक्षेत्र अधिकारी दिपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल रवींद्र तुपे, वनरक्षक दिनेश हुंबरे, दत्तात्रय बडे, चंद्रकांत मरकड, वनमजूर भारत पवार, कचरू शेख, बाळासाहेब थोरात यांच्यासह कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला. इको रेस्क्यू टीमचे अध्यक्ष नचिकेत अवधानी, मानद वन्यजीव रक्षक पुणे जिल्हा सौ. गायत्री अवधानी, दत्तात्रय राजगुरू व शारदा राजगुरू यांनीही अजगराच्या सुटकेत सहभाग घेतला.

प्राथमिक तपासणीनंतर अजगराला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.जाळ्यात वन्यजीव अडकल्याचे आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून त्याला हाताळू नये किंवा इजा करू नये. तत्काळ वनविभाग अथवा प्रशिक्षित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# कोल्हापूरच्या धर्तीवर उपपदार्थ निर्मितीचे क्लस्टर उभारणार : आ. विवेक कोल्हे

### शेतकऱ्यांना एफआरपीपेक्षा अधिक दर देणार । कोल्हे कारखान्याचे ९ लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : सहकारमहर्षी शंकररावजी कोल्हे सहकारी साखर कारखान्याने आगामी गळीत हंगामात नऊ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून ऊस उत्पादकांना एफआरपीपेक्षा अधिक दर देण्यासाठी व्यवस्थापन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही आमदार विवेक बिपीनदादा कोल्हे यांनी दिली.

कारखान्याच्या ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. आगामी हंगामात कोल्हे कारखान्यात साडेसात लाख, तर चालविण्यास घेतलेल्या रानवड सहकारी साखर कारखान्याच्या युनिट क्रमांक दोनमध्ये अडीच लाख मेट्रिक टन गाळपाचे नियोजन आहे. दोन्ही युनिट १५ ऑक्टोबरपर्यंत गाळपासाठी सज्ज करण्याचे नियोजन असल्याचे कोल्हे यांनी सांगितले. मागील पाच वर्षांत कारखान्याने एफआरपीपेक्षा सुमारे १३० कोटी रुपये अधिक दिले असून यंदाही ३० ते ३५ कोटी रुपये अधिक देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



साखर उद्योगातील वाढता उत्पादन, ऊसतोडणी व वाहतूक खर्च आणि बाजारभावातील तफावत यामुळे कारखान्यांवर आर्थिक दबाव वाढत असल्याचे कोल्हे यांनी नमूद केले. साखरेबरोबरच उपपदार्थ निर्मितीवर भर देण्यात येत असून सहकारी तत्त्वावरील सीबीजी प्रकल्प सुरू झाला आहे. कोल्हापूरच्या धर्तीवर कोपरगावात उपपदार्थ निर्मितीचे क्लस्टर उभारून सोयाबीन व मक्यावर प्रक्रिया करणारे उद्योग आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. ‘एआय मायक्रो कॉसमॉस क्रिएशन’च्या माध्यमातून सुमारे १ हजार ८२५ शेतकऱ्यांना हवामान, माती व अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे मार्गदर्शन दिले जात आहे. एकरी १०० टनांपेक्षा अधिक ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला कारखान्यातर्फे ‘बुलेट’ देण्याची योजना त्यांनी जाहीर केली. पाण्याचे काटकसरीने नियोजन करून कमी क्षेत्रात अधिक उत्पादन घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे यांनी दुष्काळसदृश परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. कुंभमेळ्यासाठी पाणी सोडताना शेतकऱ्यांच्या शेतीसाठीही पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे वळविण्याची मागणी करत शेतकऱ्यांच्या पाणी व हमीभावाच्या प्रश्नांसाठी आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी मतदारसंघातील विविध विकासकामांची माहिती देण्यात आली. गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी साडेसात कोटी, तर साईबाबा कॉर्नर ते रेल्वे स्टेशन रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणासाठी २० कोटी रुपये मंजूर झाल्याचे आमदार कोल्हे यांनी सांगितले. सभेस संचालक, पदाधिकारी, शेतकरी, सभासद व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब वक्ते यांनी केले.

## कर्णकर्कश डीजेवर कारवाई, चालकावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे कर्ण कर्कश आवाजात वाजणारा डिजे पोलिस पथकाने जप्त करुन कारवाई केली. तसेच डिजे मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे डिजे व्यावसायिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. सध्या गणेशोत्सव साजरा करण्यात येत असुन ध्वनी प्रदुषण रोखण्या करीता अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या आदेशानुसार दि. १४ सप्टेंबर २०२६ ते २० ऑक्टोबर २०२६ या दरम्यान डॉल्बी व डिजे वाजवीण्यावर प्रतिबंध करण्यात आला आहे. त्याबाबत राहुरी पोलीस स्टेशनचा वतीने स्थानिक वर्तमानपत्रामध्ये तसेच सोशल मिडीयाच्या माध्यामातुन प्रसिध्दी देण्यात आली आहे. दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे कर्ण कर्कश आवाजात डिजे वाजत होता. या बाबत अज्ञात इसमाने ११२ नंबरवर फोन करून माहिती दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन कर्ण कर्कश आवाजात वाजणारा डिजे जप्त केला. पोलीस हवालदार सचिन कारभारी ठोंबरे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी कुणाल सुनिल दुसुंगे वय २९ वर्षे, रा. वारुळवाडी, ता. नगर, याच्यावर गुन्हा रजि. नं. १०७९/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वृद्ध महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागिने हिसकावले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : घरासमोर आंब्याच्या झाडाखाली बाजेवर झोपलेल्या ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या अंगावरील सुमारे ९८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने दोन अनोळखी इसमांनी हिसकावून नेल्याची घटना बुधवारी (दि. २३) दुपारी स्टेशन रोड परिसरात घडली. या प्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, जाईबाई झुंबर शेंडगे (वय ७०) या घरासमोरील आंब्याच्या झाडाखाली बाजेवर झोपल्या होत्या. दुपारी सुमारे १.४५ वाजता दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या नाकातील एक तोळा वजनाची सोन्याची नथ व गळ्यातील चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले हिसकावून नेले. चोरी गेलेल्या दागिन्यांची एकूण किंमत सुमारे ९८ हजार रुपये आहे. याबाबत जाईबाई यांचा मुलगा संदीप झुंबर शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ८६१/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक कौशल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस हवालदार जमुना बजंगे तपास करीत आहेत. आरोपी अद्याप अज्ञात असून चोरीस गेलेला मुद्देमालही मिळालेला नाही.

## आदिनाथ कारखाना आता ओंकार ग्रुपच्या ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : करमाळा तालुक्यातील आदिनाथनगर, शेळगाव-भाळवणी येथील श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना आता ओंकार शुगर ग्रुपच्या ताब्यात जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळामार्फत राबविण्यात आलेली विक्री निविदा प्रक्रिया ओंकार शुगर ग्रुपच्या बाजूने मंजूर झाली असून, या प्रक्रियेला न्यायालयानेही हिरवा कंदील दाखविल्याची माहिती ओंकार शुगर ग्रुपचे संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांनी दिली.आर्थिक अडचणींमुळे अनेक वर्षांपासून संकटात असलेल्या या कारखान्याच्या खरेदीसाठी कायदेशीर प्रक्रिया आणि संबंधित प्राधिकरणांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून पारदर्शक निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचा दावा ओंकार ग्रुपने केला आहे. ओंकार ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याचे आधुनिकीकरण, उत्पादन क्षमता वाढविणे आणि कार्यक्षम व्यवस्थापनावर भर देण्यात येणार आहे.कारखाना पुन्हा सुरू झाल्यास करमाळ्यासह परिसरातील ऊस उत्पादकांना स्थानिक गाळपाची सुविधा मिळणार असून, ऊसतोड मजूर, वाहतूकदार, व्यापारी तसेच लघुउद्योजकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे आदिनाथ कारखान्याच्या पुनरुज्जीवनाच्या हालचालींकडे शेतकरी आणि कामगारांचे लक्ष लागले आहे.

# श्रीरामपूरचे क्रीडा संकुल अजूनही कागदावरच

### खेळाडूंना हक्काचे मैदान नाही, सुविधांसाठी प्रतीक्षा




शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहराच्या चौहो बाजुला शेती महामंडळाची मुबलक जमीन ओसाड पडली असताना गेल्या २५ वर्षापासून श्रीरामपूर क्रीडा संकुलाचे स्वप्न आजही कागदावरच आहे. नियोजनाचा अभाव, निधीची कमतरता आणि जागा उपलब्ध होत नसल्याची हास्यस्पद कारणे त्यासाठी दिली जात आहेत.

श्रीरामपूर तालुका क्रीडा होत नसल्याने हक्काचे मैदान आणि आधुनिक सुविधांसाठी क्रीडा प्रेमींना अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. राज्य सरकारच्या २००१ च्या क्रीडा धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्याची योजना आखण्यात आली होती. ग्रामीण भागातील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा मिळविण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा संकुले उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. शासनाने २००३ मध्ये क्रीडा संकुलातील सोयीसुविधांसाठी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. त्यानंतर २००९ मध्ये हा निधी एक कोटी रुपये करण्यात आला. श्रीरामपूर क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध नसल्याने एकीकडे शासनाचा निधी असतानाही खेळाडूंची घोर निराशा करण्याचे काम लालफिती वाल्या कडून केले जात आहे.

राजकीय कुरघोड्या,गैरसोयीच्या जागा यामुळे या किडा संकुलाचे काम रखडल्याचे सांगितले जात आहे. तालुका क्रीडा संकुला साठी २०० मीटर शर्यतीसाठी धावपट्टी,बॅडमिंटन हॉल,कबड्डी,खो-खो बॉस्केटबॉल आदी मैदानांसाठी २००३ मध्ये २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली होती. हा निधी मिळूनही श्रीरामपूर सह जिल्ह्यातील काही ठिकाणी ही कामे पूर्ण झालेली नाहीत.

**क्रीडा अधिकारी खुरांगे यांची उदासीनता**

क्रीडा संकुलाची सखोल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांना भ्रमणध्वनी केला असता, मी प्रवासात श्रीगोंदा तालुक्याच्या दौऱ्यावर आहे. दुपारनंतर फोन करा, असे त्यांनी सांगितले. यानंतर खुरांगे यांना भ्रमणध्वनी केला असता त्यांनी पोरकटपणा केला. क्रीडामंत्री सुनेत्रा पवार तसेच क्रीडा प्रधान सचिव रणजीत सिंह देवल आणि क्रीडा आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे खुरांगे यांच्या या कार्यपद्धतीबाबत काही क्रीडाप्रेमी ई-मेल द्वारे तक्रार करणार आहेत.

## पॉलिश करण्याच्या बहाण्याने सोन्याचे दागिने लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : सोन्या-चांदीचे दागिने पॉलिश करून देतो, असे सांगत दोन अनोळखी भामट्यांनी महिलेच्या घरातून तब्बल ५५ हजार ९०० रुपयांचे सोन्याचे दागिने लबाडीने लंपास केल्याची घटना बनपिंप्री शिवारातील पठारे वस्ती येथे घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारास दोन अनोळखी व्यक्ती विना क्रमांकाच्या पल्सर दुचाकीवरून ऋषिकेश पठारे यांच्या घरी आले. त्यांनी सोन्या-चांदीचे दागिने पॉलिश करून देतो, असे सांगून फिर्यादी यांच्या आई व पत्नीचे सोन्याचे दागिने घेतले. त्यानंतर दागिने घेऊन दोघेही पसार झाले.या प्रकरणात ५.५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेल, ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी व काळ्या मण्यांचे गंठण तसेच ०.९९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी व काळ्या मण्यांचे गंठण, असा एकूण ५५ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. ऋषिकेश प्रकाश पठारे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८५७/२०२६, बीएनएस कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक संग्राम जाधव करीत आहेत.

## विहिरीच्या वादावरून लाकडी दांडा व लाथा बुक्क्यांनी मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : विहिरीच्या कारणावरुन व दुपारी झालेल्या वादाच्या कारणावरुन आरोपींनी सुदिप शिंदे यांना शिवीगाळ, दमदाटी करुन लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील सोनगाव येथे दि. २२ सप्टेंबर रोजी रात्रीच्या वेळी घडली.

सुदिप रंगनाथ शिंदे, वय २८ वर्षे, धंदा- शेती, रा. सोनगाव, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, सुदिप शिंदे यांची धानोरे गावात शेती असुन शेजारीच दतात्रय विठ्ठल आंत्रे यांची शेती आहे. शेतात विहीर असुन दोघेही विहिरीचा वापर करतात. दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास सुदिप शिंदे यांचे वडिल रंगनाथ शिंदे व दत्तात्रय आंत्रे यांची किरकोळ बाचाबाची झाली होती. त्यानंतर रात्री ९.३० वाजता आरोपींनी सुदिप शिंदे यांना त्यांच्या घराकडे बोलावुन घेतले. तेथे सामाईक विहीरीच्या कारणावरुन व दुपारी झालेल्या वादाच्या रागातुन आरोपींनी सुदिप शिंदे यांना शिवीगाळ, दमदाटी करुन लाकडी दांडा व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली.



तसेच पुन्हा आमच्या नादी लागले तर तुला जिवे ठार मारुन टाकु, अशी धमकी दिली.

घटनेनंतर सुदिप रंगनाथ शिंदे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी नवनाथ जेजुरकर, रा. हनुमानगाव, ता. राहता, जि. अहिल्यानगर तसेच अर्जुन दतात्रय आंत्रे, आदिनाथ दतात्रय आंत्रे, दतात्रय विठ्ठल आंत्रे, रा. सोनगाव, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख हे करत आहेत.